CMYK

**LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी**
तालुका, शहर व गावनिहाय प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी



विनम्र अभिवादन
राजमाता जिजाऊ माँसाहेब भोसले यांच्या जयंती दिनी विनम्र अभिवादन

बीड वर्ष ३६ वे अंक ४५ वा फोन २३०१०१ दिनांक १२ जानेवारी २०२६ सोमवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 पाने ६ किंमत ४रु.

# जि.प.निवडणुकांबाबतीत निवडणूक आयोगाचा कारभार म्हणजे कुत्रं दळतय, आंधळं पीठ खातयं

**बीड दि.११ (प्रतिनिधी):– आंधळं दळतयं अन् कुत्र पीठ खातयं अशी एक मराठीत म्हण आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये जिल्हा परिषद निवडणुकीच्या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाची भूमिका म्हणजे कुत्रं दळतयं अन् आंधळं पीठ खातयं अशी उलटी झाली आहे असेच म्हणावे लागेल, कारण कितीही नाही म्हटलं तरी राज्य निवडणूक आयोगावर राज्य सरकारचा प्रभाव असतो. इथलेच अधिकारी तिथे बसलेले असतात. सध्या राज्य सरकारला लवकर जिल्हा परिषद निवडणूक घ्यायच्या नाहीत.सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपुर्वी सगळ्या निवडणुका आटोपून घ्या असा आदेश दिलेला असतांनाही अजुन निवडणूक आयोग गप्पगार आहे. पहिल्या टप्प्यात कोणत्या आणि दुसऱ्या टप्प्यात कोणत्या जिल्हा परिषदेच्या निवडणुका घ्यायच्या याचाच त्यांना मेळ नाही. बरं दोन टप्प्यात निवडणुका घेतल्या तर दुसऱ्या टप्प्यावर पहिल्या टप्प्याच्या निवडणूक निकालाचा परिणाम होणार नाही का? नगर पालिका निवडणुकीत असे झाल्याने निकाल लांबवले होते. आता जिल्हा परिषदेमध्ये काय करणार?**

राज्यात तब्बल ९ वर्षानंतर रडत पडत कशातरी नगर पालिकेच्या निवडणुका झाल्या, आता महानगर पालिकेच्या निवडणुका होत आहेत. या सगळ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न्यायालयीन लढ्यात अडकल्या. महानगर पालिकेचे मतदान १५ जानेवारीला होणार असून १६ जानेवारीला निकाल लागणार आहे. जिल्हा परिषद निवडणुकांची अजुन घोषणा झालेली



नाही. या निवडणुकांच्या संदर्भात ज्या जिल्हा परिषदेने आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यापेक्षा जास्त ओलांडलेली आहे अशा जिल्हा परिषदेच्या निवडणुका दुसऱ्या टप्प्यात घेण्याच्या तयारीत निवडणूक आयोग आहे, मात्र सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला जिल्हा परिषदेच्या सर्व निवडणुका २१ जानेवारीच्या आत घेऊन निकाल लावण्याचे पान २ वर

## आम्हाला मुहुर्तच सापडला नाही

### असं म्हणल्यास आश्चर्य वाटू देऊ नका

जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीवरुन सध्या जो काही गोंधळ सुरु आहे तो लोकांच्या समजण्या पलिकडचा आहे. आज कोणीतरी निवडणुका घ्या म्हणून सांगतेय. लगेच उद्या कोणीतरी कोर्टात जाऊन याचिका दाखल करतयं, तर निवडणूक आयोग सुद्धा आज एक तर उद्या दुसरीच भूमिका घेतांना दिसून येत आहे. आतापर्यंत आरक्षणाची मर्यादा ओलांडली असं सांगितलं जातयं, माात्र आता आणखी नवीन नवीन कारण पुढे केले जात आहे. उद्या एखाद्या वेळेस राज्याचे निवडणूक आयुक्त वाघमारे साहेब यांनी निवडणुका घेण्यासाठी आम्हाला मुहूर्तच सापडला नाही असं म्हटलं तर आश्चर्य वाटू देऊ नका. वाघमारे साहेब असे म्हणाल्यास त्यानंतर पुन्हा कोणीतरी कोर्टात जाईल आणि मग निवडणूक आयोगाच आमचा म्हणण्याचा उद्देश तसा नव्हता असे म्हणून सारवासारव देखील करु शकतं. असे झाल्यास फार काही आश्चर्य वाटण्यासारखे नाही.

## आरक्षणाची मर्यादा ओलांडली की नाही? हे कसं ठरवायचं हेच अजुन निश्चित नाही

**राज्यातील कोणत्या जिल्हा परिषदेने, पंचायत समितीने आरक्षणाची मर्यादा ओलांडली की नाही? हे कसं ठरवायचं हेच खूप दिवस निश्चित नव्हतं. कधी राज्यातल्या १२ जिल्हा परिषदांची नावं सांगितली जायची तर कधी त्याच जिल्हा परिषदांची निवडणूक होणार असे देखील सांगितलं जात होतं. आरक्षणाची मर्यादा ओलांडली याची नेमकी व्याख्या काय? यावरुनच बराच संभ्रम होता, तो आणखी दूर झाला की नाही यावरुन देखील चर्चा सुरु आहेत. एवढ्या चर्चा करेपर्यंत आणि वाट पाहण्यापर्यंत आरक्षणाची प्रक्रिया नव्याने करता आली असती मात्र काही ना काही कारण पुढे करुन निवडणूका पुढे ढकलायच्या असाच काहीसा प्रकार सध्या सुरु आहे. ३१ जानेवारीपर्यंत निवडणुका घ्या असे सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे, मात्र आता आरक्षणाच्या मर्यादेवरुन पुढे मागे सुरु आहे. तोपर्यंत फेब्रुवारी सुरु होईल आणि आता दहावी, बारावीच्या परीक्षा आहेत असे म्हणून पुन्हा याच पद्धतीने निवडणुका पुढे जातील अशीही शक्यता आहे.**

## पतंगांचा मांजा विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

बीड दि.११ (प्रतिनिधी):- जीवघेण्या नायलॉन किंवा सिंथेटीक मांजाचे उत्पादन, साठा, विक्री व वापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे. मकर संक्रांतीचा सण जवळ आला आहे. बीड जिल्ह्यात पतंगबाजीचा उत्साह वाढत आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी नायलॉन मांजा (चायनीज मांजा) छुप्या पद्धतीने विक्री होत आहे. हा मांजा केवळ पक्ष्यांसाठीच नाही तर मानवी जीवनासाठीही यमपाश ठरत आहे. शासनाने यावर कडक बंदी घातली आहे. हा नायलॉन किंवा सिंथेटीक मांजा काचेचा थर आणि रसायने वापरुन बनविला जातो. हा मांजा सहजासहजी तुटत नाही. दुचाकीस्वार, पादचारी रस्त्यावरुन जात असतांना हवेत लटकणारा हा मांजा गळ्याला स्पर्श केल्यास धारदार शस्त्राप्रमाणे त्वचा आणि श्वास नलिका कापतो. गेल्या वर्षी महाराष्ट्रभर अशा घटनात अनेकांना प्राण गमवावा लागला आहे तर अनेकांना कायमचे अपंगत्व आलेले आहे. पतंग कटल्यानंतर हा मांजा झाडांच्या फांद्यामध्ये किंवा विजेच्या तारांमध्ये अडकून पडतो. यामध्ये अडकल्यामुळे घारी, कबुतरे आणि चिमण्यांचे त्याच बरोबर दुर्मिळ पक्ष्यांचे पंख कापले जातात. अनेक वेळा पक्षीत मांजात अडकून तडफडून मरतात. या मांजा विरघळत नसल्याने तो अनेक अपघातांना निमंत्रण देतो. राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार नायलॉन मांजाची निर्मीती, विक्री आणि साठवणुकीवर संपूर्ण बंदी आहे. पोलीस प्रशासन आणि नगर पालिका यांच्या वतीने जिल्ह्यातील शहरा शहरात ठिकठिकाणी छापे टाकले जावेत व नॉयलॉन मांजा विकतांना किंवा वापरतांना आढळल्यास संबंधीत व्यक्तीवर इतरांचा जीव धोक्यात पान २ वर

# जिधर बम उधर हम

## सहाल चाऊस यांनी न.प.निवडणुकीत तुतारी वाजविली, आता मात्र घडी बांधण्याची तयारी

### आ.प्रकाशदादांनी अजितदादांची भेट घालून दिली

**माजलगाव दि.११ (प्रतिनिधी):– माजलगाव नगर पालिका निवडणूक निकालाला एक महिनाही झाला नाही तोच नगर पालिकेचे राजकीय समीकरणे बदलण्यास सुरुवात झाली आहे. नगराध्यक्षांचे सासरे ज्येष्ठ नगर सेवक सहाल चाऊस यांनी आ.प्रकाशदादा सोळंके यांच्यासोबत लातूर येथील महानगर पालिकेच्या निवडणूक प्रचार सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेतल्याचे विश्वसनीय सुत्रांनी सांगितले. आ.प्रकाशदादांनीच ही भेट घालून दिल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान जिधर बम उधर हम या प्रमाणे सहाल चाऊस यांनी नगर पालिका निवडणुकीत तुतारी वाजविली, मात्र आता तेच घडी बांधण्याची तयारी करु लागल्याचे दिसून येत आहे.**

माजलगाव नगर पालिकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शिफा बिलाल चाऊस या विजयी झाल्या. सहाल चाऊस, बाबुराव पोटभरे आणि मोहनराव जगताप या तिघांनी नगर पालिकेत महाविकास आघाडीची सत्ता आणली. नगर पालिका निवडणुकीच्या प्रचारा दरम्यान अत्यंत खालच्या पातळीवर टीकाटीपण्णी झाली होती, आ.सोळंकेंवर अतिशय आक्रमक भाषेत हल्लाबोल करण्याची संधी तिघांपैकी एकानेही सोडली नाही. चौफेर बाजुंनी आरोप-प्रत्यारोप झाले, मात्र निवडणूकीचा निकाल लागून अजुन एक महिनाही झाला नाही तोच राजकीय समीकरणाच्या आडून सर्वजण एक होऊ लागल्याचे पान २ वर



### स्वीकृत सदस्यांसाठी पोटभरे, जगताप, मोगरेकर, जाब्रस, रेदासणी, डोंगरे, देशमुख यांच्या नावाची चर्चा

**माजलगाव नगर पालिकेच्या उपनगराध्यक्षासह स्वीकृत सदस्य पदासाठी १५ जानेवारी रोजी निवडणूक होत आहे. उपनगराध्यक्ष पदासाठी सहाल चाउस, आ.प्रकाश सोळंकेंकडून अमोल सरवदे, राहुल लंगडे यांच्या नावाची चर्चा आहे तर स्वीकृत सदस्य पदासाठी महाविकास आघाडीकडून अभिजीत बाबुराव पोटभरे, विजय मोहनराव जगताप, बप्पा देशमुख आणि आ.प्रकाश सोळंके यांच्याकडून पत्रकार उमेश मोगरेकर, कमलेश जाब्रस, सुरेंद्र रेदासनी, चंद्रमुनी डोंगरे यांच्या नावाची चर्चा आहे.**

## मजुराच्या खून प्रकरणातील आरोपी विशाल सूर्यवंशी गजाआड



बीड (प्रतिनिधी):- शहरातील अंकुश नगर परिसरात प्लंबिंग काम करणाऱ्या मजुरावर दिवसाढवळ्या गोळीबार करून व धारदार शस्त्राने तोंडावर वार करत निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. या प्रकरणातील आरोपी गेल्या पाच दिवसांपासून फरार होता. अखेर पोलिसांनी रविवारी आरोपी विशाल उर्फ बप्प्या सूर्यवंशी याला बेड्या ठोकल्या आहेत.
बीड शहरातील अंकुश नगर भागात दि. ६ जानेवारी रोजी रोजी दुपारी हर्षद तुळशीराम शिंदे या तरुणावर बंदुकीतून गोळ्या झाडत नंतर धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याची घटना घडली होती. या घटनेचा सीसीटीव्ही व मोबाईल व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत होते.पोलिस अधीक्षकांनी हत्या झाल्यानंतर तत्काळ स्थानिक गुन्हे शाखा व शिवाजीनगरच्या टीम आरोपीच्या शोधासाठी रवाना केल्या होत्या.तब्बल पाच दिवसांच्या शोधानंतर रविवारी रात्री ८.३० वाजता कळंबकेज रोडवरून आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपअधीक्षक पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे शिवाजी बंटेवाड, पीएसआय सुशांत सुतळे कर्मचार मनोज वाघ, राहुल शिंदे, अर्जुन यादव, पान २ वर

# खासगी कोचिंगवर आता सरकारी वॉच

मुंबई दि.११ (प्रतिनिधी):- स्पर्धा परीक्षा, शाळा आणि खासगी शिकवणी वर्गांमुळे विद्यार्थ्यांवर वाढत चाललेल्या मानसिक ताणामुळे सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांवर अतिरिक्त शैक्षणिक आणि मानसिक ताण येऊ नये यासाठी शाळा आणि खासगी शिकवणी वर्गांसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना लागू करण्यात येणार आहेत. तसेच प्रत्येक जिल्ह्यात निरीक्षण समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
विद्यार्थ्यांवर खासगी शिकवणी आणि कोचिंग वर्गांमधून होणाऱ्या मानसिक ताणतणावाबाबत दाखल याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने गंभीर भूमिका घेतली होती. सुखदेव सहा यांनी आंध्र प्रदेश सरकारविरोधात दाखल केलेल्या याचिकेत स्पर्धा परीक्षा, जास्त वेळ वर्ग, सततच्या चाचण्या, निकालांची तुलना आणि यशाची हमी देणाऱ्या जाहिरातींमुळे विद्यार्थ्यांवर असह्य दबाव निर्माण होत असल्याचा मुद्दा मांडला होता.
या प्रकरणावर २५ जुलै २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने आदेश देत देशातील सर्व राज्य सरकारांना राज्य सरकारने शाळा आणि खासगी शिकवणी वर्गांसाठी केले नवीन नियम लागू विद्यार्थ्यांवरील ताण कमी करण्यासाठी ठोस पान २ वर

विनम्र अभिवादन



स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दिनी विनम्र अभिवादन

### आशफाक इनामदार यांनी केली होती तक्रार

## बीडमध्ये सिमेंट रस्ते व नालीचे निकृष्ट काम करणाऱ्या गुत्तेदाराला सीओंनी पाठविली नोटीस

बीड दि.११ (प्रतिनिधी):- शहरातील प्रभाग क्रमांक ६ मधील किल्ला वेस ते कागजी कमान ते मस्जिद ते उमर मस्जिद (हाफिज गल्ली) व मोहम्मदीया मस्जिद ते मिल्लत उर्दु शाळेपर्यंत सिमेंट रस्ते व नालीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याची तक्रार नगर सेवक आशफाक इनामदार यांनी केली होती. त्याची दखल घेत मुख्याधिकाऱ्यांनी संबंधीत गुत्तेदार शेख माजेद शेख मोहम्मद यांना दि.६ जानेवारी २०२६ रोजी नोटीस बजावली आहे. आपणास ब्लॅक लिस्टमध्ये का टाकण्यात येऊ नये याचा खुलासा तात्काळ मागविण्यात आला आहे. खुलासा सादर न केल्यास आपले काहीही म्हणने नाही असे गृहीत धरुन कायदेशीर कारवाईची तंबी मुख्याधिकाऱ्यांनी गुत्तेदार शेख माजेद यांना दिली आहे.
जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत झालेल्या स्थापत्य स्वरुपाच्या कामाबाबत आशफाक इनामदार यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. प्रभाग क्रमांक ६ मधील सिमेंट रस्ते व नालीचे काम निकृष्ट दर्जाचे पान २ वर

### सीओंनी कागदाला कागद लावला

बीड शहरातील प्रभाग क्रमांक ६ मधील किल्ला वेस ते कागजी कमान व इतर सिमेंट रस्ते, नालीची कामे निकृष्ट झाल्याची तक्रार आशफाक इनामदार यांनी ९ मे २०२५ रोजी केली होती. त्या आधी देखील म्हणजेच १३ मार्च २०२४ रोजी देखील खान यांनी याच कामांची तक्रार केली होती. मात्र यामध्ये आतापर्यंत काहीच झालेले नव्हते. सीओंनी सुद्धा या तक्रारीची दखल घेतली नव्हती, मात्र तब्बल ७ महिन्यानंतर मुख्याधिकाऱ्यांनी संबंधीत गुत्तेदार शेख माजेद यांना याच तक्रारींचा संदर्भ देऊन नोटीस बजावली आहे. नोटीस बजावतांना सीओंनी कागदाला कागद लावल्याचे दिसून येत आहे. जशी तक्रार आहे तसेच नोटीसमध्ये लिहिण्यात आले असून अगदी शेवटच्या ओळीत याचा खुलासा करावा असे म्हटले आहे. यावरुन आलेले टपाल जसेच्या तसे टपाली पाठविण्याचा प्रयत्न झाल्याचे पान २ वर

## संक्रांती निमीत्त डॉ.आळणे यांच्या स्कीन क्लिनीककडून मोफत त्वचारोग तपासणी शिबीर

बीड दि.११ (प्रतिनिधी):- येथील डॉ.मोहिनी भागवत (आळणे) यांच्या होलिस्टीक स्कीन क्लिनीकच्या वतीने संक्रांती निमीत्त आज दि.१२ जानेवारी रोजी मोफत त्वचा रोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत गरजु रुग्णांनी या तपासणी शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन होलिस्टीक स्कीन क्लिनीकच्या वतीने करण्यात आले आहे.
बीड शहरातील जालना रोडवरील आळणे हॉस्पिटल बिल्डींगमध्ये होलिस्टीक स्कीन क्लिनीक येथे डॉ.मोहिनी भागवत (आळणे) यांच्या उपस्थितीत मोफत त्वचारोग तपासणी शिबीर होत आहे. विविध त्वचा रोग त्यामध्ये गजकर्ण, सुरंजी, खरुज, एक्झिमा, इसब, कोड, गुप्तरोग, अंगावर पाणी भरलेले फोड येणे, नागीण, वांग, काळे डाग, केसांचे आजार, त्वचा शस्त्रक्रिया आदी पान २ वर

### खराब रस्त्यांमुळे नागरीक त्रस्त

बीड दि.११ (प्रतिनिधी):- शहरातील अनेक भागातील रस्ते खूप सुधारीत झाले आहेत तर अनेक भागात याच्या उलट परिस्थिती आहे. त्यामुळे बीडचा विकास की अधोगती? हे कोडे सोडविणे अवघड झाले आहे. नगर परिषद निवडणुका झाल्याने आता हा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी होत आहे.

# व्यसनमुक्ती केंद्र झाले लुटारुंचे अड्डे



### बीड जिल्ह्यात मनमानी कारभार, प्रशासनाने तातडीने कारवाई करण्याची मागणी

बीड दि.११ (प्रतिनिधी):-जिल्ह्यात तरुणांमध्ये व्यसनाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून दारू व इतर व्यसनांपासून तरुणांना दूर ठेवण्यासाठी कुटुंबीय मोठ्या अपेक्षेने व्यसनमुक्ती केंद्रांचा पान २ वर

### व्यसनमुक्ती की लूट?

**उपचारासाठी दाखल होणाऱ्या तरुणांचे आयुष्य धोक्यात घालणारी ही केंद्रे खरंच व्यसनमुक्तीसाठी आहेत की फक्त पैशांची लूट करणारी अड्डे आहेत, असा सवाल आता सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप न केल्यास भविष्यात आणखी गंभीर घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**

### संशयास्पद मृत्यूने खळबळ

**मागील महिन्यात बीड शहरातील एका व्यसनमुक्ती केंद्रात रात्री एका तरुणाला दाखल करण्यात आले होते. मात्र सकाळी त्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर संतप्त कुटुंबीयांनी आक्षेप घेतल्याने शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी संबंधित व्यसनमुक्ती केंद्रात जाऊन सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीआर जप्त केला होता. ही घटना व्यसनमुक्ती केंद्रांतील कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली आहे.**

CMYK


## नवचैतन्य, नवी दिशा महापुरुष

# स्वामी विवेकानंद
## शैक्षणिक दृष्टीकोन

'मानव हा ईश्वराचा सर्वोकृष्ट अविष्कार होय' मानव हे अमूर्त ईश्वराचे मूर्त स्वरूप आहे अशी स्वामी विवेकानंदजी यांची मनोधारणा होती. स्वयं शिक्षणाने, स्वयंप्रेरणेने मूल शिकते. सुप्तशक्तींच्या विकासाला योग्य परिस्थिती निर्माण करणे हे शिक्षणाचे कार्य आहे. ज्ञानाचा उगम हा मानवी मनातून होतो. ज्ञान हे मानवाच्या मनात उपजतच सुप्तावस्थेत असते. मन हे विश्वाचे विशाल ग्रंथालय आहे. बाह्य जगातील एखाद्या प्रसंगातून सूचना मिळते. ती सुचना मनाला कार्यप्रवण करते व त्यातून ज्ञानाचा अविष्कार होतो ज्ञानप्राप्ती म्हणजे आत्मानुभूती, आत्मसाक्षात्कार होय. शिकणे याचा अर्थ अज्ञानाचे पटल दूर करणे होय. मुलांच्या गरजाप्रमाणे त्यांना शिक्षण द्यावयास हवे, मुलांमध्ये लपलेल्या सुप्त प्रवृत्तींनी त्यांच्या गरजा निश्चित केल्या गेल्या पाहीजेत. पालकांच्या इच्छा व गरजा मुलांवर लादल्या जाऊ नयेत. मुलांच्या गरजा विचारात घेऊन शिक्षणाची उभारणी केली जावी. मुलांना सुप्त शक्तींची जाणीव करून देणे व त्या सुप्तशक्तींच्या विकासाला योग्य परिस्थिती निर्माण करणे हे शिक्षणाचे कार्य होय. शिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्वाचा अविष्कार, जीवनाची घडण होय. सदविचारांचे संस्कार मनावर घडणे होय, चारित्य संवर्धन होय.अंतःकरणातील मानवतेचा विकास हेच खरे शिक्षण शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट मानव निर्माण करणे हे होय म्हणून स्वामीजी ' माणुस घडविते ते शिक्षण ' असे म्हणतात.

आधुनिक विचारसरणी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणारे पाटोदा गावचे आदर्श सरपंच श्री. भास्कर दादा पेरे पाटील यांनी जुन्या प्रथा/ अंधश्रद्धा सोडून सत्य/खरे ते योग्यच गोष्टींचा स्विकार करावा असे साध्या -सोप्या भाषेत सहजतेने सांगतात त्यात अंतविधीची राख गंगेत न फेकता त्यात झाडे लावा.

सकारात्मक गोष्टी पाहा, नकारात्मकता सोडून दया ज्या बाबींना मनाई आहे त्यांना पर्याय शोधून द्या. पर्याय उपलब्ध करून दिले तरच बदल घडतात हे फक्त ते बोलत नाहीत तर करून दाखविलेले आहे,



लोकांना जीवन जगण्यासाठी व अर्थोत्पादनासाठी तंत्रज्ञानाचे व व्यावसायिक विषयांचे ज्ञान हवे असे ते म्हणतात. शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या चुका दाखविण्या ऐवजी त्यांच्यात असलेल्या सुप्तशक्तींबद्दल त्यास सांगावे. प्रत्येकाला पूर्णत्वाला पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावा. सर्वसामान्यांचे शिक्षण , स्त्री शिक्षण यावर त्यांचा भर होता. शिक्षणाची सुरुवात घरापासून होऊन नंतर समाज, राष्ट्र आणि शेवटी मानवता व विश्वबंधुत्त्व असा विकास व्हावा अशी स्वामी विवेकानंदजी यांची अपेक्षा होती.



**शिवराम पवार**
मो.नं.९४०३४१४८६५
मुख्याध्यापक
जि.प.प्रा.शाळा टाकळगाव
ता.गेवराई जि. बीड.

## १२ जानेवारी राष्ट्रीय युवा दिन

# महाराष्ट्राची तरुण परंपरा आणि स्वामी विवेकानंदांचे विचार

**१२ जानेवारी हा दिवस भारतासाठी तर महत्त्वाचा आहेच , पण महाराष्ट्रासाठी तो अधिक अर्थपूर्ण आहे. स्वामी विवेकानंदांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा राष्ट्रीय युवा दिन हा केवळ एका थोर संन्याशाची आठवण नाही ; तो महाराष्ट्राच्या तरुण परंपरेचा , संघर्षशील इतिहासाचा आणि वैचारिक वारशाचा उत्सव आहे. कारण महाराष्ट्राने नेहमीच विवेक , कर्तृत्व आणि सामाजिक बांधिलकी असलेली तरुण पिढी घडवली आहे.**

महाराष्ट्राचा इतिहास पाहिला तर युवकशक्तीने घडवलेले अनेक टप्पे दिसतात. शिवरायांचे स्वराज्य असो , समाजसुधारणेची चळवळ असो , स्वातंत्र्यलढा असो किंवा आधुनिक काळातील लोकशाही संघर्ष प्रत्येक टप्प्यावर तरुण पुढे होते. स्वामी विवेकानंदांचे विचार या परंपरेला वैचारिक अधिष्ठान देणारे ठरतात.

स्वामी विवेकानंदांनी युवकांना सर्वप्रथम आत्मविश्वास दिला.



दुर्बलता हे पाप आहे हे त्यांचे वाक्य महाराष्ट्राच्या तरुण मनाला फार जवळचे आहे. कारण इथे संत तुकारामांनीही सांगितले माणूस घडतो तो आत्मसन्मानातून. विवेकानंदांची आध्यात्मिकता पलायनवादी नव्हती ; ती कृतीशील होती. हीच परंपरा महाराष्ट्राने स्वीकारली.

महाराष्ट्रातील तरुणाईने शिक्षण , समाजसेवा , सहकार , साहित्य , विज्ञान , प्रशासन , लष्कर आणि क्रीडा प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातून आलेले युवक आज देशाची सूत्रे हाताळताना दिसतात. हे शक्य झाले कारण महाराष्ट्राच्या मातीत विचारांची सुपीकता आहे.

आजचा महाराष्ट्र मात्र अनेक आव्हानांशी झुंज देतो आहे. बेरोजगारी , स्पर्धा परीक्षा , शिक्षणातील असमानता , ग्रामीण-शहरी दरी , व्यसनाधीनता , दिशाहीनता या समस्या तरुणांसमोर उभ्या आहेत. सोशल माध्यमांचा अतिरेक तरुणाईला झटपट यशाचे स्वप्न दाखवतो , पण कष्टांची किंमत कमी करतो. अशा वेळी विवेकानंदांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. विवेकानंद सांगतात की तरुणाने आधी स्वतःला घडवले पाहिजे. शरीर सुदृढ , मन निर्भीड आणि विचार स्पष्ट असले पाहिजेत. महाराष्ट्राच्या तरुणाने हे तत्त्व स्वीकारले , तर तो केवळ स्वतःचे भविष्य नाही , तर समाजाचे भविष्यही घडवू शकतो.

महाराष्ट्रातील युवक चळवळींचा विचार केला तर समाजसुधारणेपासून ते लोकशाही मूल्यांपर्यंत एक स्पष्ट धागा दिसतो. सत्यशोधक परंपरा , शिक्षणाचा प्रसार , स्त्री-पुरुष समता , सामाजिक न्याय या साऱ्या गोष्टींमध्ये युवकांची भूमिका निर्णायक राहिली आहे. विवेकानंदांचा संदेश सेवाच खरी साधना या भूमिकेला बळ देतो.

राष्ट्रीय युवा दिन महाराष्ट्रात साजरा करताना तो केवळ कार्यक्रमांपुरता मर्यादित राहू नये. तरुणांनी स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे मी माझ्या गावासाठी , जिल्ह्यासाठी , राज्यासाठी काय करतो आहे ? मी केवळ संधी शोधतो आहे की जबाबदारी स्वीकारतो आहे ?

महाराष्ट्राला केवळ नोकरी शोधणारी तरुणाई नको आहे ; महाराष्ट्राला नेतृत्व करणारी तरुणाई हवी आहे. विवेकानंद म्हणतात राष्ट्र उभे राहते ते चारित्र्यावर. हे चारित्र्य घरातून , शिक्षणातून आणि समाजातून घडते. आज जेव्हा महाराष्ट्र बदलाच्या उंबरठ्यावर उभा आहे , तेव्हा युवक हा सर्वात मोठा आधार आहे. शेतीतील नवकल्पना , उद्योगशीलता , सामाजिक सलोखा , पर्यावरण संवर्धन , तंत्रज्ञानाचा सुज्ञ वापर या सर्व क्षेत्रांत तरुण नेतृत्व पुढे आले , तर महाराष्ट्र पुन्हा एकदा दिशादर्शक राज्य ठरेल.



**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
तहसीलदार, बीड.

१२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्राच्या तरुणाला आठवण करून देतो तू इतिहासाचा वारसदार आहेस. पण भविष्याचा शिल्पकारही तूच आहेस.



स्वामी विवेकानंदांचा विचार आणि महाराष्ट्राची कृतीशील परंपरा एकत्र आली , तर युवकशक्ती केवळ उभी राहत नाही ; ती राष्ट्र घडवते.

●●●

पान १ वरून

### जि.प.निवडणुकांच्या बाबतीत निवडणूक आयोगाचा कारभार म्हणजे...

आदेश दिलेले आहेत. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार अजुन पहिल्या टप्प्यातील निवडणुकाच घोषीत झालेल्या नाहीत. अर्धा जानेवारी संपत आलेला आहे. पहिला टप्पा संपल्यानंतर दुसरा टप्पा कधी होणार ? न्यायालयाने दिलेली ३१ जानेवारीची मर्यादा निवडणूक आयोग ओलांडणार हे निश्चित झालेले आहे. नगर पालिकेच्या निवडणुका चालू असतांनाच जिल्हा परिषद निवडणुकांचा ५० टक्केची मर्यादा ओलांडल्याचा वाद समोर आला होता. तेंव्हाच या बाबतीत तातडीने निर्णय होणे आवश्यक होते. ज्या जिल्हा परिषदेमध्ये ५०% आरक्षणाची मर्यादा ओलांडलेली आहे तेथील आरक्षण ५०% च्या आत करण्या संदर्भात तातडीने उपाययोजना करुन निवडणूक आयोगाने सज्ज व्हायला हवे होते, परंतु निवडणूक आयोगाने कुठलीच ठोस भूमिका घेतली नाही. आता जानेवारीच्या उरलेल्या १५-२० दिवसात राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या निवडणुका कशा होणार ? हा गंभीर प्रश्न आहे. कितीही नाही म्हटलं तरी राज्य निवडणूक आयोग हा राज्य सरकारच्या प्रभावाखालीच काम करत असतो. राज्य सरकारलाच जिल्हा परिषद निवडणुका लवकर घ्यायच्या नाहीत असेच दिसून येत आहे. आता पुढे निवडणुका लांबल्या तर लगेच फेब्रुवारी महिन्यात दहावी,बारावीच्या परीक्षा चालू होतात, मग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. याला जबाबदार कोण ? अशी भूमिका मांडली गेली आहे. अन् मग पुन्हा निवडणूके किती दिवस पुढे ढकलायच्या असा प्रश्न निर्माण होतो.

### जिधर बम उधर हम...

चित्र पहायला मिळत आहे. सहाल चाऊस यांच्या सून शिफा बिलाल चाऊस यांनी ५ जानेवारी रोजी नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला. आता १५ जानेवारी रोजी उपनगराध्यक्ष पदासह स्वीकृत सदस्य पदासाठी निवडणूक होत आहे. त्यापुर्वीच नगराध्यक्षांचे सासरे तथा ज्येष्ठ नगर सेवक सहाल चाऊस यांनी लातूर महानगर पालिका निवडणुकीच्या प्रचारा दरम्यान उपमुख्यमंत्री अजितदादांची भेट घेतली. विशेष म्हणजे ही भेट स्वतः आ.प्रकाश सोळंके यांनीच घडवून आणल्याचे सांगितले जात आहे. चाऊस यांनी दादांची प्रत्यक्ष भेट घेऊन पक्षात काम करण्याची इच्छा प्रकट केल्याचे बोलले जात आहे. या संदर्भात अजितदादांचा एक व्हीडीओ देखील व्हायरल झाला असून त्यामध्ये जाहीर सभेच्या व्यासपीठावरुन अजितदादा आपल्या भाषणात म्हणत आहेत की ''आताच मला आ.प्रकाश सोळंके आणि काही लोक भेटले, नगराध्यक्ष म्हणाले की, दादा मला तुमच्या बरोबर काम करायचं, मी म्हटलं हरकत नाही''. असे भाषण त्या क्लीपमध्ये आहे, आता आ.प्रकाश सोळंकेंनी नेमक्या कोणत्या नगराध्यक्षांची भेट घालून दिली हे काही वेगळे सांगण्याची गरज नाही. यातून सहाल चाऊस अजितदादांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वाटेवर असल्याची चर्चा होऊ लागली आहे. एकुणच नगर पालिका निवडणुकीत महाविकास आघाडी म्हणून तुतारीच्या चिन्हावर निवडणूक लढविलेले सहाल चाऊस निकालानंतर मात्र सत्तेसोबत जाण्याच्या प्रयत्नात असल्याचे दिसून येत असल्याने ''जिधर बम उधर हम'' अशीच काहीशी परिस्थिती चाऊस यांच्या बाबतीत पहायला मिळत आहे.

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकाराने १) श्री.दिनेश हनुमानप्रसाद मुंदडा २) श्री.अनुप अशोक मंत्री व ३) श्री.पंकज पांडुरंगजी भुतडा यांचे संयुक्त मालकीचा व ताब्यात असलेला बीड तरफ खोड स.न.९९ मधील बीड नगर परिषद हद्दीचे बाहेरील प्लॉट क्र.३ ज्यास ग्रामपंचायत आनंदवाडी मिळकत क्रमांक ८०३/३ असा मिळालेला आहे. ज्याची लांबी : दक्षिण-उत्तर १५.५० मीटर व रुंदी : पुर्व-पश्चिम १४ मीटर एकूण क्षेत्रफळ २१७ चौ.मी. असून चतु:सिमा पुर्वेस - मंजूर ले आऊटमधील ६ मीटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - मंजूर ले-आऊटमधील प्लॉट क्र.६, दक्षिणेस - मंजूर ले-आऊटमधील प्लॉट क्र.४ व उत्तरेस: मंजूर ले-आऊटमधील ९ मीटर रुंदीचा रस्ता येणे प्रमाणे वर्णन असलेला प्लॉट माझे पक्षकाराने कायम खरेदी घेण्याचा ठराव केला असून विक्रेत्यांनी सदर प्लॉट निर्विवाद असल्याची खात्री दिली आहे. या उपर सदर प्लॉटमध्ये जर कोणाचे काही हितसंबंध जसे की, खरेदीखत, इसार पावती, बक्षीसपत्र, आममुखत्यारपत्र, तारण, गहाणखत इ.स्वरुपाचे असतील तर संबंधीतांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत खालील पत्त्यावर योग्य त्या पुराव्यासह आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप आला नाही तर माझे पक्षकार सदरील प्लॉट निर्विवाद आहे असे समजून सदर प्लॉट कायदेशीर खरेदीखत करुन घेतील व त्यानंतर कोणाचा कसलाही उजर चालणार नाही.

सबब हे जाहीर प्रगटन.

– जाहीर प्रगटन देणार –

**ॲड.विजयकुमार मोतीलाल कासट**
कासट कॉम्प्लेक्स, सुभाष रोड, बीड.
मो.नं.९४२२७४१०९१

12975

### डॉ.आळणे यांच्या क्लिनीककडून मोफत तपासणी

सुविधा या क्लिनीकमध्ये उपलब्ध आहेत. आज दि.१२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत आयोजित मोफत त्वचारोग तपासणी शिबीराचा गरजुंनी लाभ घ्यावा. नोंदणीसाठी संपर्क क्रमांक ०२४४२-२९९१५८ आणि ९०७५८०६०७५ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### आरोपी विशाल सुर्यवंशी गजाआड...

मनोज परंजाने, अश्फाक सय्यद, नितीन वडमारे, सिद्धेश्वर मांजरे तसेच स्थानिक गुन्हे शाखा व शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे केली.

### पतंगांचा मांजा विक्री करणाऱ्यांवर...

येईल असे कृत्य करणे, पर्यावरण संरक्षण कायदा, वन्य जीव संरक्षण कायद्यातील विविध तरतुदींनुसार कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी अनेक नागरिकांनी केली आहे.

### रस्ते व नालीचे निकृष्ट काम करणाऱ्या गुत्तेदारास नोटीस

झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी न.प.बीड यांनी शेख माजेद शेख मोहम्मद कन्स्ट्रक्शन बीड यांना नोटीस बजावली आहे. निकृष्ट काम केल्या प्रकरणी आपणास ब्लॅक लिस्टमध्ये का टाकण्यात येऊ नये अशा आशयाची नोटीस बजावण्यात आली असून तातडीने खुलासा देखील मागविण्यात आला आहे. दरम्यान मुख्याधिकाऱ्यांनी निकृष्ट कामाबाबत थेट गुत्तेदारास नोटीस बजावल्याने खळबळ उडाली असून यापुढे अशा प्रकारची बेजबाबदार कामे करणाऱ्यांवरही याच पद्धतीने कारवाई करण्यात येणार असल्याचे यातून दिसून येते.

### सीओंनी कागदाला कागद लावला...

पहायला मिळत आहे. ७ महिने नगर पालिकेने तक्रारीची दखल का घेतली नाही ? मुख्याधिकाऱ्यांना नोटीस पाठवायला ७ महिने का लागले ? असे देखील प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

### खाजगी कोचिंगवर आता सरकारी वॉच...

मार्गदर्शक सूचना तयार करण्याचे निर्देश दिले होते. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य जपण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्यावरही भर देण्यात आला होता.

या आदेशानुसार शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णय जारी केला आहे.

शिक्षणाच्या नावाखाली

विद्यार्थ्यांवर होणाऱ्या अनावश्यक दबावावर आता प्रशासकीय पातळीवर नियंत्रण ठेवले जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळा आणि खासगी शिकवणी वर्गांवर कठोर कारवाई केली जाईल असा इशाराही देण्यात आला आहे.आता प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय निरीक्षण समिती स्थापन करण्यात आलेले आहे. या समितीत शिक्षण विभागाचे अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, महिला आणि बालविकास अधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्ता किंवा बाल-मानसतज्ज्ञ यांचा समावेश असणार आहे.

### व्यसनमुक्ती केंद्र झाले लुटारुंचे अड्डे...

आधार घेत आहेत. मात्र, हीच व्यसनमुक्ती केंद्रे आता उपचाराऐवजी लुटीचे अड्डे बनत असल्याचा गंभीर आरोप होत आहे.

व्यसनमुक्ती केंद्रात दाखल करताना संबंधित कुटुंबाकडून १५ हजार ते २० हजार रुपये प्रवेश फी घेतली जाते. दारूचे व्यसन लागलेल्या तरुणाचे कुटुंब हे दारू सोडवण्यासाठी व्यसनमुक्ती केंद्र मध्ये प्रवेश घेण्यासाठी कुटुंबीयांना विविध अटी सांगितल्या जातात. त्या तरुणापासून व्यतीत असलेल्या कुटुंबीयांची अक्षरशा आर्थिक लूट केली जाते. २००००एवढी रक्कम घेऊनही केंद्रांमध्ये मूलभूत सुविधा दिल्या जात नसल्याच्या अनेक तक्रारी समोर आल्या आहेत. एखादा व्यसनाधीन तरुण आजारी पडल्यास त्याच्या उपचाराचा खर्चही थेट कुटुंबीयांकडून वसूल केला जातो.

निकृष्ट भोजन व अमानुष वागणूक

अनेक व्यसनमुक्ती केंद्रांमध्ये दिले जाणारे भोजन अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी आहेत. तसेच काही केंद्रांमध्ये तरुणांना मारहाण केली जाते, मानसिक व शारीरिक छळ होत असल्याची माहितीही समोर येत आहे. मात्र यावर कोणाचाच वचक नसल्याचे चित्र आहे.

प्रशासनाकडे ठोस मागण्या

या पार्श्वभूमीवर सामाजिक न्याय विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन बीड जिल्ह्यातील सर्व व्यसनमुक्ती केंद्रांची तातडीने तपासणी करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. नियमात नसलेल्या व्यसनमुक्ती केंद्रांचे परवाने तात्काळ रद्द करण्यात यावेत.

पान ६ वरून

### आवादा कंपनीच्या विरोधात शेतकऱ्याचा संताप

मात्र एक महिना उलटूनही एकही अधिकाऱ्याने शेतात पाय ठेवला नाही, चौकशी तर दूरच राहिली. यामुळे प्रशासन दलितांबाबत जाणीवपूर्वक उदासीन आहे का ? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. गुंड धमकावतात, कंपनी काम सुरू ठेवते आणि प्रशासन गप्प का ? दलित शेतकऱ्याचा आवाज दाबण्यासाठी कोणाचा आशीर्वाद आहे ? असा सवाल देखील उपस्थित केला जात आहे,आवादा कंपनीला संरक्षण देणारे अधिकारी कोण ? जर दलित शेतकऱ्याला न्याय मिळत नसेल, तर कायद्याचा धाक फक्त गरीबांसाठीच आहे का ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास आवादा कंपनीविरोधात आणि संबंधित अधिकाऱ्यांविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते व दलित संघटनांनी दिला आहे. याप्रकरणात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष घालण्याची मागणी केली जात आहे. संबंधित धमक्या देणाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

### चिंचगव्हाण येथे सभामंडपासाठी निधी मंजूर

आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा उपस्थित महिला भगिनींनी व्यक्त केली.

### यशवंत विद्यालय कुर्ला ची शैक्षणिक सहल उत्साहात

महादेवाचे दर्शन घेऊन वेरूळ लेनी देवगड शिर्डी येथे साईबाबांचे दर्शन घेऊन शनिशिंगणापूर करुण मोहटादेवी चे दर्शन घेऊन बीड मार्ग कुर्ला येथे आनंदात पोहचली यावेळी मुख्याध्यापक अभिषेक राऊत, सहल प्रमुख कदम सर, मुंजाल सर,डोंगरदिवे सर, माने सर, मस्के सर, खोटे काका यांनी सहल पुर्णत्वास नेण्यास परिश्रम घेतले.

### नगराध्यक्षाचे पदग्रहण होताच गावच्या स्वच्छतेसाठी भाभी लागल्या कामाला

दि. ९ जानेवारी रोजी राबवत भारत सरकारने सुरू केलेल्या पाच वर्षाकरिता २०२१ मधील स्वच्छ भारत अभियान २.० स्वच्छता मोहीम मध्ये गेवराई नगरपरिषद ने आपला सहभाग नोंदवला. व नवीन बस स्थानक तसेच भारत सरकारने पाच वर्षासाठी सुरू केलेल्या २०२१ मधील स्वच्छ भारत अभियान २.० स्वच्छता मोहीम गेवराई शहरांमध्ये नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपरिषद कडून राबवण्यात आली यावेळी सर्व नगरसेवक व न.प. कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

### महाराष्ट्रातील ग्रामपंचायत निवडणुका तात्काळ जाहीर करा–भागवत गव्हाणे

वाढून पाणीटंचाईची समस्या गंभीर होते. अशा आपत्कालीन परिस्थितीत टँकर नियोजन, विहीर अधिग्रहण व स्थानिक पाणीपुरवठ्याचे प्रश्न लोकनियुक्त सरपंच अधिक प्रभावीपणे हाताळू शकतो, असा ठाम दावा संघटनेने केला आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून तेवढी तत्परता अपेक्षित नसल्याचेही नमूद करण्यात आले.दरम्यान, सरपंच ग्रामसेवा परिषद महाराष्ट्र राज्य यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर राज्य सरकारने या रास्त मागणीचा गांभीर्याने विचार केला नाही, तर भागवत गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल. हा लढा केवळ अधिकारांचा नसून, गावांच्या अस्मितेचा आणि विकासाचा असल्याचे संघटनेने ठामपणे सांगितले आहे.या निवेदनाला राज्यातील विविध जिल्ह्यांतील सरपंच प्रतिनिधींचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे. आता या महत्त्वाच्या व संवेदनशील विषयावर ग्रामविकास मंत्री व राज्य सरकार काय निर्णय घेतात, याकडे संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

### सुजाणाबाई पवार यांचे निधन

नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पती,विवाहित दोन मुले शिक्षक सोन्याबापू पवार व प्रकाश पवार विवाहित तीन मुली,जावई,सुना, नातवंड,पत्रंड असा मोठा परिवार आहे.त्यांच्या दुःखात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

### आष्टी पोलिसांची धडाकेबाज कारवाई

(मावा), कच्चा माल, पॅकिंग साहित्य, यंत्रसामग्री व इतर साहित्य असा साडेनऊ लाख रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस निरीक्षक भुतेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक नरवडे,पोलीस हवालदार प्रवीण क्षीरसागर, तागड, काकड, आहेर, नवले, सव्वाशे,जमदाडे पो.शि.वाणी, सजगणे, बनसोडे यानी केली.

### बीडच्या अबरार पठाणची राज्यात चर्चा

महाविद्यालयालाही मोठा गौरव प्राप्त झाला आहे.अबरार पठाण हा मिलिया अध्यापक विद्यालयाचा विद्यार्थी असून, त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयातील शिक्षकवर्ग, सहकारी विद्यार्थी तसेच क्रीडाप्रेमींनी त्याचे अभिनंदन केले आहे. भविष्यात तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही चमकदार कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.या यशामुळे बीड जिल्ह्यातील युवकांना क्रीडा क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी नवी प्रेरणा मिळाली असून, अबरार पठाण हा अनेकांसाठी आदर्श ठरत आहे.

### विज्ञान प्रदर्शनास आदर्श फाउंडेशनच्या

झाले होते. प्रास्ताविक प्राचार्य मडके सर यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. पायलताई बाफना यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद केला यावेळी त्यांच्यासोबत कोमलताई पारख व खेत्रे ताई उपस्थित होत्या विद्यार्थ्यांनी उत्तरोत्तर प्रगती करावी असे मार्गदर्शन केले. विज्ञान म्हणजे कुतुहल व प्रत्येक गोष्टीला प्रश्न विचारणे म्हणजे विज्ञान व त्या पडलेल्या प्रश्नाच्या उत्तरातून तंत्रज्ञानाची निर्मिती होते. मुलांमधील चिकित्सिक वृत्तीतून नवनवीन प्रयोग निर्माण होतात. मुलांमध्ये कुतुहल निर्माण करण्याचे काम बाल वैज्ञानिक प्रदर्शन करत आहे. मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड मॅडम जिल्ह्यातील आलेले बाल वैज्ञानिकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना स्वच्छते विषयीची प्रतिज्ञा दिली. विद्यार्थ्यांनी पेटंट मिळवण्यासाठी प्रयत्न करावे. विद्यार्थ्यांनी नवीन वाटेवर चालण्याचा प्रयत्न करावा व नवीन शोध लागण्यासाठी नव नवीन प्रश्न निर्माण करून उत्तर शोधण्याचा प्रयत्न करावा. असे मनोगत व्यक्त केले.

### जिल्हास्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार रफिक पठाण यांना जाहीर

पत्रांच्या व्यवस्थापन कामातही रफिक पठाण यांची भुमिका महत्वाची ठरलेली आहे. पत्रकारितेसह व्यवस्थापनात दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना जिल्हास्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. दि.३१ जानेवारी २०२६ रोजी होणार्या विशेष सोहळ्यात रफिक पठाण यांना महबुब खान युसूफ जई आदर्श पत्रकार पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. याबद्दल रफिक पठाण यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### धर्मनाथ बीज सप्ताहाचे उद्यापासुन आयोजन

टाकून धर्मनाथा बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात आरंभ होईल. अखंड हरिनाम सप्ताह मध्ये दररोज काकडा आरती, विष्णू सहस्त्रनाम,ज्ञानेश्वरी पारायण सोहळा गाथा भजन हरिपाठ प्रवचन सेवा,भावार्थरामायण संख्याकाळी ८:०० ते ११:०० हरी किर्तन, संगीत भजन, सार्वजनिक जागर असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे .

हरी किर्तन सेवा- १३ जानेवारी मंगळवारी संजय नाना धोंडगे नाशिक, १४ जानेवारी बुधवार कविराज झावरे अहिल्यानगर, १५ जानेवारी गुरुवारी संतोष आढावणे बुलढाणा, १६ जानेवारी शुक्रवारी योगीराज महाराज गोसावी पैठण,१७ जानेवारी शनिवारी कृष्णा महाराज चौरे पंढरपूर, १८ जानेवारी रविवारी श्रावण महाराज जगताप विसापूर,१९ जानेवारी सोमवार चंद्रकांत महाराज खळेकर राहुरी, २० जानेवारी मंगळवार दुपारी ह भ प अक्रूर महाराज साखरे गेवराई यांचे १२ ते ०२ या वेळेत काल्याचे कीर्तन होईल, महा प्रसाद होईल. २० संध्याकाळी ८:०० ते ११ वाजता ह भ प रामायणाचार्य पदमाकर महाराज देशमुख अमरावती यांचे कीर्तन.

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये जास्तीत जास्त भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी महंत ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी केले आहे

किसान बाबानी सुरू केलेली भाकरीची परंपरा

गुरुवर्य सदगुरू वै. किसान बाबा महाराज यांच्या हस्ते ७५ वर्षा पूर्वी पासून गोरक्षनाथ टेकडी परिसरातील ८०ते ९० गावातील भाविक भक्तां भाकरीची पंगत नित्यनेमाने दररोज घेऊन येतात.

गर्भगिरी प्रदक्षिणा ; नवनाथ बाबा यांची पालखी सोहळा

' १४ जानेवारी बुधवार रोजी सकाळी साडेआठ वाजता गर्भगिरी प्रदक्षिणा महंत गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांची भव्य पालखी सोहळा निघणार आहे टाळ मृदुंग ढोल ताशा च्या गजरामध्ये भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आलेले आहे तरी भाविक भक्तांनी उपस्थित राहावे'

व्यवस्था व नियोजन

- किर्तना करीता १ एककर भव्य डोम,२ एककर रिकाम्या जागेत अतिरिक्त बसण्याची सोय, ५ एककर मोठ्या गाड्यांची पार्किंग व २ एककर टू व्हिलर साठी व्यवस्था,पिंपळनेर पोलिस ठाणे ए. पी आय घुगे व कर्मचारी यांचा चोख बंदोबस्त

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

## प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांचा लोकरत्न पुरस्कार देवुन गौरव

बीड दि ११(प्रतिनिधी)- लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाऊंडेशन बीड यांच्या वतीने प्रशासकीय व उद्योजकता विकास क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (चउएऊ)द्वारा जिल्हा उद्योग केंद्र बीड यांना लोकरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाला सुदाम थोटे विभागीय अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र छत्रपती संभाजी नगर संजय बावस्कर विभागीय लेखापाल दत्ता मुळे प्रशासकीय अधिकारी एम सी ई डी छत्रपती संभाजी नगर भगवत वैध राष्ट्रीय अध्यक्ष लोकशाही पत्रकार संघ व इतर पत्रकार मंडळी तसेच सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशनचे मान्यवर सदस्य तसेच एम सी ई डी चे व्याख्याते मार्गदर्शक माजी प्राचार्य मनमतआपा हेरकर, प्रा.डॉ पांडुरंग सुतार आदि उपस्थित होते.

# पार्श्वभूमी

## केज येथे श्रीकृष्ण मंदिर भूमिपूजन व महाविष्णू यागाचे भव्य आयोजन

चिंचोली माळी दि ११(प्रतिनिधी)- केज बीड रस्त्यावर व केज शहरा पासून जवळ असलेल्या भगवान श्रीकृष्ण आश्रम, येथे श्रीकृष्ण मंदिर भूमिपूजन व भव्य महाविष्णूयाग (यज्ञ) तसेच रामायणाचार्य ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांची संगीतमय रामकथा व कीर्तन महोत्सव यांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा बुधवार दि. ११ मार्च २०२६ रोजी प्रारंभ होऊन गुरुवार दि. १९ मार्च २०२६ रोजी सांगता होणार आहे.



# जिल्ह्यातील पोलिस पाटील पद भरतीचे आरक्षण निश्चिती नंतर जाहिरातीकडे गावो-गावच्या इच्छुक उमेदवाराचे लक्ष

मांजरसुबा दि ११ (प्रतिनिधी) -बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील ११७९ रिक्त पदासाठी दि.३० डिसेंबर पर्यंत आरक्षण प्रक्रिया पुर्ण करण्याचे जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिका-याना दिलेले आहेत.त्यानुसार माजलगाव-२४ डिसेंबर,धारुर,वडवणी,केज, अंबाजोगाई,परळी,बीड,गेवराई,शिरुर कासार-२६ डिसेंबर, पाटोदा,आष्टी-१ जानेवारी असे सर्व उपविभागात आरक्षण सोडत होऊन आक्षेप-हरकतीचा कालावधी उलटून आठवडा उलटला आहे. तरी पुढील प्रक्रियेस जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडुन जाहिरात काढुन भरतीचा पुढील वेळापत्रक काढण्यास विलंब होताना दिसुन येत आहे.अनुसुचित जाती-१३७,अनुसुचित जमाती-८७,वि.जा.अ.-३९,भ.ज.ब.-३५,भ.ज.क.४६-भ.ज.ड.-२१, विशेष मागास वर्ग-२५,इतर मागास वर्ग-२४६,एसईबीसी-११८,आ.दु.घटक-१३०,अराखीव - २९५ असा एकुण ११७९ पदासाठी जिल्ह्यात ही भरती होत असून महिला साठी ३०% पदे राखीव ठेवण्यात आलेली आहेत.जालना जिल्ह्यातील भरती झालेली आहे.हिंगोली जिल्ह्याची जाहिरात निघुन वेळापत्रक जाहीर झाले आहे.मात्र बीड जिल्ह्यातील पोलिस पाटील भरतीचा विधानसभेच्या सर्वोच्च सभागृहात विषय होऊनही बीड जिल्ह्यात पोलिस पाटील पद भरतीकडे जिल्हा प्रशासनासह पालकमंत्री, लोकप्रतिनिधी कडुन पाहिजे तसे लक्ष नाही.तरी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष घालुन बीड जिल्ह्यातील पोलिस पाटील भरतीचा विषय लवकरात लवकर जाहिरात काढुन वेळापत्रक ठरवुन मार्गी लावावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मुकेश रसाळ यांनी करून पोलिस पाटील पद भरतीची जाहिरात केव्हा निघते? अशी चातकासारखी वाट पाहणा-या उमेदवाराच्या वतीने केली आहे.

# अखेर चिमुकल्यांच्या आक्रोशाने जिल्हा प्रशासन जागे दत्तनगर शाळेसाठी विद्यार्थ्यांना मिळाला मोकळा रस्ता

बीड दि ११(प्रतिनिधी) -माजलगाव तालुक्यातील गेवराई मतदारसंघातील टाकरवण जिल्हा परिषद शाळा केंद्रांतर्गत येणाऱ्या दत्तनगर वस्तीशाळेच्या विद्यार्थ्यांना अखेर त्यांच्या हक्काची शाळा इमारत मिळाली आहे. शाळेसाठी सुसज्ज इमारत उपलब्ध असतानाही शाळेकडे जाणारा रस्ता अतिक्रमणामुळे बंद झाल्याने गेल्या सव्वा दोन महिन्यांपासून विद्यार्थ्यांना लिंबाच्या झाडाखाली, उघड्यावर शिक्षण घ्यावे लागत होते.

या गंभीर प्रकरणी शालेय व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक व पालकांनी वरिष्ठ कार्यालयांकडे वारंवार लेखी निवेदने सादर केली होती ; मात्र प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नव्हती.तेंव्हा सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सहकारी, शिक्षणप्रेमी, पालक व विद्यार्थ्यांनी दि. ५ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर रास्ता रोको आंदोलन करत घोषणाबाजी केली होती.नंतर विद्यार्थ्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पालक व विद्यार्थ्यांशी संवाद साधत तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांना तातडीने शाळेचा रस्ता खुला करण्याचे आदेश दिले.जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार शुक्रवार दि ९ जाने. रोजी गटविकास



अधिकारी ज्योत्स्ना मुळीक, तलाठी राहुल भदे व ग्रामविकास अधिकारी प्रतापसिंह नाईक यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देत पंचनामा केला.शाळेकडे जाण्यासाठी तीन मार्ग खुले करण्यात आले असून आता वर्ग पुन्हा शाळेच्या इमारतीत सुरू करण्यात आले आहेत.यासंदर्भात गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक यांनी सांगितले की,वरिष्ठांच्या आदेशानुसार रस्ता खुला करण्यात आला आहे. भविष्यात शाळेच्या मार्गात कोणीही अडथळा निर्माण केल्यास नियमानुसार संबंधितांविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल केला जाईल.''

## माजी प्राचार्या रोहिणी गजेंद्रगडकर यांची सदिच्छा भेट



केज दि ११ (प्रतिनिधी)- तालुक्यातील कुंबेफळ येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक या शाळेला सरस्वती महा विद्यालय केजच्या माजी प्राचार्या श्रीमती रोहिणी गजेंद्रगडकर-काळे मॅडम यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांशी शैक्षणिक हितगुज केले व विद्यार्थ्यांना शिक्षण विषयी मार्गदर्शन केले.

श्रीमती गजानन गडकर याचे सोबत आलेले त्यांचे यजमान शामराव भाऊराव काळे केज चे सेवानिवृत्त सबपोष्टमास्तर यांनीही विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी मार्गदर्शन केले. या दोघांनी या शाळेतील सर्वशिक्षक, शिक्षिका वृंदांना मार्गदर्शन करुन पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या. या शाळे तील लोकनेते मा.आ. कै. बाबुरावजी आडसकर यांच्या स्मरणार्थ ''आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५'' प्राप्त शिक्षक आबासाहेब तुळशीराम धपाटे सर यांचा सत्कार केला. श्रीमती गजेंद्रगडकर मॅडम या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची या शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक राजाभाऊ दत्तात्रय कदम यांच्या शिक्षिका होत्या. या दांपत्याचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन आदर सत्कार करुन सन्मानित करण्यात आले. या शाळेतील शिक्षक डॉ. रामकिशन मुळे सर, आकाश लोंढे सर, राहुल बजरंग बचुटे सर, प्राथमिक पदवीधरशिक्षक संदीप मेघराज ठोंबरे सर, श्रीमती भोरे निलावती आनंदराव मॅडम, श्रीमती उटीकर अंजली गोविंदराव मॅडम, ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम आदी शिक्षकवृंद उपस्थित होते.

# कारखाना प्रशासनाचे अखेर लोटांगण ; ऊसतोड मजूर गणेश डोंगरेच्या कुटुंबाला २१ लाखांची मदत

वडवणी दि ११ (प्रतिनिधी)-न्याय मागून मिळत नाही, तो संघर्षाने खेचून आणावा लागतो, याची प्रचिती आज पुन्हा एकदा आली आहे. ऊसतोड मजूर गणेश डोंगरे यांच्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर, त्यांच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी पुकारलेल्या आंदोलनाला मोठे यश आले आहे. साखर कारखाना प्रशासनाने आंदोलकांच्या कणखर भूमिकेपुढे नमते घेत, शनिवारी पहाटे डोंगरे कुटुंबाला २१ लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश सुपूर्द केला.

गणेश डोंगरे यांचा ऊसतोडणी दरम्यान अपघाती मृत्यू झाला होता. एका गरीब आणि कष्टाळू कुटुंबाचा आधार गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत होती. मात्र, कारखाना प्रशासनाकडून सुरुवातीला मदतीबाबत योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने जनक्षोभ उसळला होता.गणेश डोंगरे यांच्या कुटुंबाला सन्मानजनक मदत मिळावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते आणि आंदोलकांनी कारखान्यावर ठिय्या मांडला होता. प्रा.सोमनाथराव बडे, संजयभाऊ आंधळे, कृष्णा तिडके, माऊली सिरसाट, सतिषबप्पा बडे, मानवी हक्क अभियानाची वडवणी तालुका अध्यक्ष विष्णु मुजमुले,श्रीमंत मुंडे,अशोकअप्पा निपटे यांच्यासह शेकडो आंदोलक या लढ्यात सहभागी झाले होते. कडाक्याच्या थंडीतही आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम होते.आंदोलनाचा वाढता जोर आणि जनभावना लक्षात घेता, कारखाना प्रशासनाला अखेर चर्चेचे पाऊल उचलावे लागले. दीर्घकाळ चाललेल्या चर्चेनंतर आणि आंदोलकांच्या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासनाने २१ लाख रुपये देण्याचे मान्य केले. आज पहाटेच्या सुमारास हा धनादेश अधिकृतपणे डोंगरे यांच्या शोकाकुल कुटुंबीयांकडे सोपवण्यात आला.हा विजय केवळ पैशांचा नसून, एका कष्टकरी मजुराच्या हक्काचा आणि संघटित शक्तीचा आहे. गणेश डोंगरे यांच्या कुटुंबाला या मदतीमुळे थोडा आधार मिळेल, पण कष्टकऱ्यांच्या जीवाचे मोल प्रशासनाने वेळीच ओळखायला हवे.''यावेळी गणेश डोंगरे



यांचे कुटुंबीय आणि मोठ्या संख्येने त्यांचे चाहते व ऊसतोड मजूर उपस्थित होते. ''लढा दिला तरच न्याय मिळतो'' अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत.

## तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट शाळेकडून वनवासी मंडळींचे स्वागत

बीड दि ११ (प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील तांदूळवाडी घाट येथे ग्रामस्थांनी गावामध्ये भावार्थ रामायण लावले असून या रामायणातील लक्ष्मण शक्ती कार्यक्रमास्थव गावातील मंडळी चौथा दिवस वनवासाला जाऊन परतली असता तांदळेश्वर विद्यालय तांदुळवाडी घाट व जिल्हा परिषद शाळा तांदळवाडी या शाळेकडून तांदळवाडी घाट या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राम लक्ष्मण सीता हनुमान यांची भूमिका निभावली .

यावेळी वनवासी दिंडीचे गावकऱ्यांनी अतिशय जोरदार स्वागत केले. या वनवासी मंडळींचे स्वागत साठी महिला भगिनी गावांमधील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. संपूर्ण गावांमध्ये रांगोळी काढून व पाद्यपूजा या वनवासी मंडळींची करून घरोघरी त्यांना औक्षण करून त्यांचे स्वागत केले जात होते. या कार्यक्रमांमध्ये तांदळेश्वर विद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनींच्या लेझीम च्या गजरामध्ये त्यांची जोरदार स्वागत केले व गावांमध्ये खूप मोठी मिरवणूक काढण्यात आली याप्रसंगी तांदळेश्वर विद्यालयाचा संपूर्ण स्टाफ जिल्हा परिषद शाळेचा संपूर्ण स्टाफ मुख्याध्यापक क्षीरसागर सरांसहित उपस्थित होता

## सनशाईन इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी मातांसाठी घेतलेल्या विविध स्पर्धांचे प्रजासत्ताकदिनी वितरण



अंबाजोगाई दि ११(प्रतिनिधी)- सनशाईन पब्लिक इंग्लिश स्कूल मोरेवाडी ता. अंबाजोगाई येथे विद्यार्थ्यांच्या मातांना आपल्यातिल कलागुण दाखवण्यासाठी संधी मिळावी. यासाठी पाच जानेवारी ते नऊ जानेवारीपर्यंत विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेसाठी विद्यार्थी मातांचा प्रतिसाद मिळाला आहे. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष संजीवनीताई देशमुख या होत्या. सनशाईन इंग्लिश स्कूल मध्ये सावित्रीबाई फुले राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थी मातांना आपले कलागुण दाखवण्यासाठी संधी मिळावी यासाठी सनशाईन इंग्लिश स्कूल मध्ये या स्पर्धेचे आयोजन केले होते. संगीत खुर्ची स्पर्धा,रांगोळी,पाककला,फॅन्सी ड्रेस, विद्यार्थी मातांसाठी या स्पर्धेच्या आयोजन करण्यात आले होते. परीक्षक म्हणून संजीवनीताई देशमुख आणि श्रीमती कचरे यांनी काम पाहिले. स्पर्धेमध्ये विजेत्या महिलांना २६ जानेवारी रोजी वितरण सोहळा होणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका शितल काळे,वैशाली कावरे,कोमल कांबळे,पूजा ठोंबरे , आदिनी परिश्रम घेतले..

# उपरे परिवारातर्फे सावित्रीबाई फुले जयंती सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी

बीड दि ११ (प्रतिनिधी)- थोर समाजसुधारिका,स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उपरे परिवाराच्या वतीने मोठ्या उत्साहात व सामाजिक जाणीव जपत दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी साजरी करण्यात आली. हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत असून, महिलांच्या शिक्षण, सक्षमीकरण व वैचारिक प्रबोधनाचा उद्देश ठेवून हा कार्यक्रम आयोजित केला जातो.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महिलांसाठी स्नेह मिलनाचे आयोजन करण्यात आले. उपरे परिवाराच्या वतीने दरवर्षी या जयंतीनिमित्त प्रेरणादायी महापुरुष, महामानव व थोर समाजसुधारक यांची विचारधारा मांडणारी पुस्तके महिलांना भेट म्हणून दिली जातात. तसेच महिलांच्या आरोग्याविषयी जागृती व्हावी या उद्देशाने आरोग्य विषयक मार्गदर्शक पुस्तकेही वितरित करण्यात येतात. वाचनातून विचार समृद्ध होतात तसेच आरोग्यविषयक माहितीमुळे महिलांचे जीवन अधिक सुदृढ व सक्षम होते, असा संदेश या उपक्रमातून दिला जातो.या कार्यक्रमास बीड परिसरातील महिला भगिनी मोठ्या



संख्येने उपस्थित होत्या. उपरे परिवारातील श्रीमती कमल हनुमंतराव उपरे, सौ. मृणालिनी संतोष उपरे, प्रियंका संदीप उपरे व कुमारी श्रावस्ती संदीप उपरे यांनी उपस्थित महिलांचे स्वागत व आदरातिथ्य केले.सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारा आणि महिलांना शिक्षण, विचारप्रवर्तन, आरोग्य जागृती व आत्मनिर्भरतेकडे प्रेरित करणारा उपरे परिवाराचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी व अनुकरणीय ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## साने गुरुजी निवासी विद्यालय केजच्या विद्यार्थ्यांनी दिला स्वच्छते बाबत संदेश

केज दि ११(प्रतिनिधी)- केज नगरपंचायत च्या वतीने आयोजित केलेल्या स्वच्छता अभियानात शहरातील साने गुरुजी निवासी विद्यालय केज च्या शाळेतील स्काऊट गाईड विको क्लब व विद्यार्थ्यांनी धारुर रोड ते भवानी चौक या स्वच्छ शहर सुंदर शहर , भवानी चौकची साफसफाई करून परिसरातील केर कचरा साफ करुन स्वच्छता केली. यावेळी ग्रामस्थांना विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर व उत्कृष्ट असे स्वच्छतेवर आधारित पथनाट्य सादर करून स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

या प्रसंगी उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात पथनाट्याला प्रतिसाद दिलाहे पथनाट्य व स्वच्छता अभियानात संकुलाच्या प्राचार्या डॉ.कविता कराड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आला या प्रसंगी केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड, गटनेते हारुणभाई इनामदार,सोनकांबळे व इतर नगर पंचायतचे नगरसेवक व कर्मचारी उपस्थित होते तसेच शाळेतील कर्मचारी गुजर नागनाथ,कल्पना जोशी, मजहर शेख,इंद्रमोहन कराड यांनी ही विद्यार्थ्यां सोबत या स्वच्छता मोहीमेत सहभाग नोंदविला होता.

# डॉ.मिसबाह शेख जिल्ह्यातील पहिल्या ग्लुकोमा सर्जन

### पत्रकार दिनानिमित्त पत्रकाराच्या वतीने केला सत्कार

जामखेड दि ११(प्रतिनिधी)- - जामखेडचे भूषण ठरलेले डॉ. रजनीकांत आरोळे, कवी व वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांच्या नंतर डॉ. मिसबाह शेख जिल्ह्यात पहिल्यांदा ग्लुकोमा सर्जन ही पदवी धारण केली आहे. त्यामुळे त्या जामखेड करांसाठी हे भूषण ठरल्या आहेत. पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांच्या वतीने जामखेड पत्रकार संघाचे अध्यक्ष नासीर पठाण व मिडिया क्लबचे अध्यक्ष सुदाम वराट यांनी डॉ .मिसबाह, तिचे आई वडील व मामा समवेत सत्कार केला. डॉ. मिसबाह शेख या अगदी पहिलीपासून खूपच हुशार विद्यार्थीनी. जामखेड येथील ल ना होशिंग माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयातून २०१२ मध्ये दहावी बोर्ड परीक्षेत ९८.४५ टक्के गुण घेत तालुक्यात प्रथम तसेच पुणे बोर्डात पहिल्या पन्नास मध्ये क्रमांक पटकावला. बारावीला ८९ टक्के गुण घेत एन्स्पायर अवार्ड शिष्यवृत्ती मिळवली. वडील डॉक्टर असल्याने लहान पणापासून वैद्यकीय क्षेत्राची आवड निर्माण झाली. त्यादृष्टीने नीटची तयारी करत शासकीय कोट्यातून एमबीबीएस साठी काशीबाई नवले मेडिकल कॉलेज, पुणे येथे नंबर लागला साडेपाच वर्षात पदवी मिळवली यानंतर एम.एस. (नेत्ररोग) पदव्युत्तर शिक्षण लातूर येथून प्रथम श्रेणीत पूर्ण केले. यानंतर देशातील अग्रगण्य असलेल्या कोईम्बतूर (तामिळनाडू) येथून सुपर स्पेशलायझेशन ग्लुकोमा विषयातील दोन वर्षांची फेलोशीपचे शिक्षण पूर्ण केले. ही शिक्षण घेणारी डॉ. मिसबाह शेख हि जिल्ह्यातील पहिल्याच आहेत. त्यामुळे खरोखरच जामखेड करांसाठी भूषण ठरल्या आहेत. डॉ. मिसबाह शेख या जिल्ह्यातील पहिल्याच ग्लुकोमा सर्जन ठरल्या आहेत. पत्रकारांशी बोलताना त्या म्हणाल्या की, मी माझी



सेवा अहिल्यानगर शहरात सुरू करणार आहे. पण जन्मभूमी असणाऱ्या जामखेड साठी शनिवार व रविवारी असे आठवड्यातील दोन दिवस वेळ देणार आहे .

## के.एस.पी.विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा

बीड (प्रतिनिधी)- के.एस.पी. विद्यालय, बीड येथे दर वर्षा प्रमाणे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहत साजरे करण्यात आले. या कार्यक्रमास इयत्ता १ ली ते ९ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी, सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी आयोजित केलेला वार्षिक उत्सव, जो विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव असतो आणि समाजालाही जोडतो. या कार्यक्रमांमध्ये गाणी, नृत्य, एकांकिका आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि समाज यांच्यात संबंध दृढ होण्यास मदत झाली.

# दिव्यांग व्यक्ती हक्क अधिकार अधिनियमाचे अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे सचिव तुकाराम मुंडे यांचे आदेश जारी

बीड दि ११(प्रतिनिधी)- जिल्हास्तरीय सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना दिव्यांग व्यक्ती हक्क अधिकार अधिनियमाचे प्रशिक्षण देणे अत्यंत निकडीचे व गरजेचे आहे असे संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी सचिव तुकाराम मुंढे यांच्या निदर्शनास आणून देताच त्यांनीया बैठकीत या स्वरूपाचे आदेश निर्गमित केले. असे माहिती महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी दिली.दिव्यांग कर्मचारी सदर्भात दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी शासन मान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत सचिव भा.प्र.से तुकाराम मुंडे यांनी बैठकीचे आयोजन केले होते. सदर बैठकीत संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांच्या संकल्पनेतून व राज्याध्यक्ष साईनाथ पवार यांच्या स्वाक्षरीने दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांना संघटनात्मक निवेदन देण्यात आले. सदर निवेदन विचारात घेऊन सचिव तुकाराम मुंढे यांनी संघटना पदाधिकाऱ्यांसमवेत विस्तृत स्वरूपात बैठक आयोजित करून सदर बैठकीत निर्देश दिले. दिव्यांग कर्मचाऱ्यांना सहायक उपकरणे पुरविण्याबाबत वित्तीय अनुदानात ५ लाख इतक्या रकमेची वाढ करणे, जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे शासकीय दिव्यांग कर्मचाऱ्यांनाही प्रशासकीय बदलीतुन सुट देवुन प्रशासकीय शासन निर्णय निर्गमित करण्यास प्राधान्यक्रम देणे, राज्यातील सर्व अधिकार कर्मचाऱ्यांना दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमाबाबत प्रशिक्षण देवून दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांप्रती अधिकारी कर्मचाऱ्यांमधे संवेदना व जागृती निर्माण करणे, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत असलेल्या दिव्यांग व्यक्तींच्या तक्रार निराकरण समितीच्या बैठका नियमित स्वरूपात आयोजित करून बैठक आयोजनाबाबतचा अहवाल शासन स्तरावर सादर करणे इ. स्वरूपाचे निर्णय या संपन्न झालेल्या बैठकीत घेण्यात आले. या स्वरूपाची माहिती संघटना राज्य अध्यक्ष साईनाथ पवार यांच्यासह संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले, कोषाध्यक्ष विलास भोतमांगे, जिल्हाध्यक्षा श्रीमती आरती बाविस्कर, जिल्हाध्यक्ष अजिनाथ हाडुळे, संजय बर्डे, महादेव शिंदे इत्यादी संघटना पदाधिकाऱ्यांनी संघटना प्रसिद्धी पत्रकांन्वय दिली आहे.

# नागरिकांनी बाल विवाह मुक्त बीड जिल्हा मोहिमेत सहभागी व्हावे - समिर पठाण

शिरूर कासार दि ११ (प्रतिनिधी)- केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालय भारत सरकार यांच्या वतीने विविध सामाजिक संस्था आणि राज्य सरकारच्या मार्फत बाल विवाह मुक्त भारत अभियान दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ ते ८ मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असून याची सुरुवात विशाखापट्टणम येथून करण्यात आलेली आहे.

या अभियानामध्ये बाल विवाह निर्मुलन जनजागृती, प्रचार, प्रसार , प्रसिध्दी करणे नागरिकात जाणिव निर्माण व्हावी म्हणुन शपथ घेणे व भारत बाल विवाह मुक्त करणे असा संकल्प करण्यात आला असून त्याचाच एक भाग म्हणून बाल विवाह मुक्त बीड जिल्हा अभियान सुरू आहे. यात जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी बाल विवाह मुक्तीची शपथ घेऊन बाल विवाह मुक्त बीड जिल्हा मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन ग्रामीण विकास केंद्र गोमळवाडा तालुका शिरूर जिल्हा बीड या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व बाल हक्क कार्यकर्ते समिर पठाण यांनी केले आहे .बीड जिल्ह्यात बाल विवाहाचे प्रमाण हे अधिक असून जिल्हा महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकावर आहे बीड जिल्हा बाल विवाह मुक्त करण्यासाठी प्रशासनासह अनेक सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्था हे सर्वोतोपरी प्रयत्न करत आहेत या बाल विवाह निर्मुलन चळवळीत आपला व आपल्या कुटुंबाचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे म्हणुन जिल्ह्यातील सर्व नागरिक, विद्यार्थी, महिला, पुरुष यांनी https: stopchildmarriage. wcd.gov.in /या प्रशासनाने जाहीर केलेल्या लिंकवर जाऊन ऑनलाईन शपथ घ्यावी व बाल विवाह मुक्तीच्या सामाजिक चळवळीत सहभागी व्हावे असे देखिल त्यांनी म्हटले आहे

# बुरंडवाडीत उद्या ह.भ.प.श्रीराम महाराज विडेकर यांचे कीर्तन

केज दि ११ (प्रतिनिधी)- तालुक्यातील बुरंडवाडी (विडा) येथील डॉ. विश्वनाथराव कराड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील आदर्श शिक्षक कै.पंडित बळीराम भोसले यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्त आयोजित श्रीमद् भागवत कथेची सांगता मंगळवार १३ जानेवारी रोजी ह.भ.प महंत श्रीराम महाराज विडेकर यांच्या सुश्राव्य कीर्तनाने होणार आहे.




गेल्या वर्षभरापूर्वी कै.पंडित भोसले यांचे दुःखद निधन झाले होते.त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ बुरंडवाडी येथे गेली सात दिवसांपासून अध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असुन ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज शास्त्री यांच्या रसाळ वाणीतून 'श्रीमद् भागवत कथा' ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले होते.या कथेचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.या धार्मिक महोत्सवाची सांगता मंगळवारी दुपारी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर (साधू शिवरामपुरी मठ संस्थान विडा) यांच्या सुश्राव्य कीर्तनाने होणार आहे. विडेकर महाराजांचे कीर्तन ऐकण्यासाठी वारकरी सांप्रदायातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कीर्तन सोहळ्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तरी या कीर्तन सोहळ्यास आणि महाप्रसादास जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन भोसले परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्वामी विवेकानंद एक चरित्र्यवान युवा आणि आदर्श मातृभक्त

**स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. हे एक महान योगी, तत्वज्ञ् आणि रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य होते. ज्यांनी शिकागो धर्म परिषदेत माझ्या अमेरिकेतील बंधू आणि भगिनींनो यशरख्या भाषांनानी मन जिंकली.स्वामी विवेकानंद हे तरुण युवकांसाठी युथ आयकॉन आहेत. जे त्यांना लक्ष केंद्रित जीवन जगण्यासाठी प्रेरणा देतात.' उठा जागे व्हा,आणि ध्येय प्राप्ती होई पर्यंत थांबू नका'. असा प्रेरणा दायी संदेश त्यांनी युवक-युवतीना दिला. चारित्र्य-निर्मिती,आत्म्यजागरूकतेवर भर दिला. तसेच स्वामी विवेकानंद यांची मातृ भक्ती ही नावाखन्याजोगी आहे. स्वामी विवेकानंद यांची आई भुवनेश्वरी त्यांच्या प्रती असलेले प्रेम व आदर यांची प्रचिती असलेले प्रसंग पाहावंयास मिळतात.**

भारतीय कुटूंबात मातेचे स्थान याची महती वर्णन करताना ते म्हणतात की, एका भारतीयांसाठी त्याची आई ही या भुतलावरील ईश्वरी अवतार असते. आपण मातेला देवी मानतो. या जगात जे काही खऱ्या नि स्वार्थी प्रेमाची रूप म्हणजे आई आहे. घरातील क्लेश,कलह व दुःख सहन करूनही निरंतर आपल्या मुलांवर प्रेमाचा वर्षाव करून सुखी राहणारी देवी म्हणजे माता.आजच्या युवक युवतीने स्वामी विवेकानंद यांचे विचार आपल्या जीवनात अंगीकारले पाहिजेत. तरुण पिढीने आपल्या आयुष्यात ध्येय गाठण्यासाठी संघर्ष करावा लागतो, त्यासाठी तो प्राप्त होई पर्यंत शांत न बसता उद्देश प्राप्ती पर्यंत शांत राहता कामा नये. आजच्या तरुण युवकांने निर व्यसनी राहून आपले शरीर व चारित्र्य सांभाळून स्वामी विवेकानंद सारखे तेज आपल्या चेहऱ्यावर आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या आई वडिलांप्रती प्रेम,आदर, व काळजी जपली पाहिजे. ज्या माता पित्यांनी आपल्या व त्यांच्या आयुष्यात अनेक कष्ट उचलून आपल्याला घडविण्या साठी आयुष्य खर्ची केले त्यांचा संभाळ केला पाहिजे.स्वामी विवेकानंद जयंती निमित्त त्यांचा एक चारित्र्य वान युवा व आदर्श मातृ भक्त म्हणून तरुण पिढीने आदर्श घ्यावा हे विचार व्यक्त करते.





**-प्रा.मनिषा गिराम-करपे**
**कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा**


# आजच्या स्मार्ट युगातील युवकांसाठी

**स्वामी विवेकानंदाचा जन्मदिवस 'राष्ट्रीय युवक दिन'म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. यावरून आपल्या लक्षात येते की राष्ट्र निर्माणात युवकांचे महत्व स्वामी विवेकानंदांना माहीत होते. स्वामी विवेकानंदांनी आपली सारी व्याख्याने युवकांना उद्देशून दिली आहेत. परंतु आजचा युवक स्मार्टफोन, इंटरनेट, सोशल मीडिया आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या युगात जगतो आहे. कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध आहे पण दिशा, धैर्य आणि मुल्ये हरवत चालली आहेत . अशावेळी स्वामी विवेकानंदाचे विचार आजही दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात.**

स्वामी विवेकानंद हे एक समाजसेवकच नव्हे तर समाज सुधारक होते त्यांच्या विचारांनी लोकांमध्ये क्रांती घडवून आणली . स्वामी विवेकानंदांनी काही खास संदेश दिले होते त्यांचे अनमोल शब्द आजही लोकांमध्ये जिवंत आहेत आणि आयुष्याच्या वळणावर पुढे जाण्याची ते प्रेरणा देतात. त्यांचे शब्द तुमचे जीवन बदलू शकतात आणि तुम्हाला नवीन गोष्टी करण्यास प्रोत्साहित करू शकतात. ते युवकांना म्हणतात, उठा, जागे व्हा, आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका. आजच्या युवकांसाठी हा संदेश म्हणजे आळस, भीती आणि अपयशावर मात करा, सतत प्रयत्न करा, शॉर्टकट नव्हे तर सातत्यावर विश्वास ठेवा. युवकांनी स्वतःवर विश्वास ठेवला पाहिजे कारण तुम्ही असीम शक्तीचे भंडारा आहात. आज अनेक युवक एकमेकांशी तुलना करतात आणि न्यूनगंडात अडकतात , सोशल मीडियाच्या लाईक्सवर स्वतःची किंमत ठरवतात, म्हणूनच विवेकानंद सांगतात तुमची खरी ताकद तुमच्या आत आहे स्क्रीनवर नाही. स्वामी विवेका नंदाच्या मते शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नसून माणसातील सुप्त शक्ती आणि पूर्णत्वाचा आविष्कार घडवणे आहे. जे मन, मेंदू आणि मनगट यांना बळकट करते चारित्र्य घडवते आणि आत्मनिर्भर बनवते तेच खरे शिक्षण म्हणूनच ते म्हणतात, राष्ट्र निर्मितीसाठी मला स्नायूंचे पोलाद आणि मनाचा वज्र असलेले युवक हवेत आणि यासाठी एकाग्रता या साधनेची आवश्यकता आहे कारण एकाग्रता ही ज्ञानसाधनेची गुरुकिल्ली आहे . प्रयोगशाळेत काम करणारा वैज्ञानिक , योग साधणारा योगी, ग्रहताऱ्यांचा अभ्यास करणारा खगोल तज्ञ, ज्ञानप्राप्तीसाठी झटणारा विद्यार्थी, या सर्वांच्या नवनिर्मितीच्या मुळाशी एकाग्रता आढळते. जीवन विषयक तत्त्वज्ञान सांगताना विवेकानंद म्हणतात, सुप्तशक्तींचा पूर्ण आविष्कार म्हणजे शिक्षण . ज्ञान हे मुळातच मनुष्याच्या ठिकाणी असते ते बाहेरून येत नाही. शिक्षणाचा मूळ हेतू हा व्यक्ती मधील सुप्त गुणांचा विकास करणे हा आहे. मुल शिकत असताना त्याच्या शिकण्याच्या प्रक्रियेतील सर्व प्रकारचे अडथळे दूर करणे हे शिक्षकाचे मुख्य काम आहे. केवळ माहिती गोळा करणे आणि ती मुलांच्या मेंदूत कोंबने म्हणजे शिक्षण नाही असे ते म्हणतात. विवेकानंदांचा तत्कालीन इंग्रजी शिक्षण पद्धतीस विरोध होता . फक्त कारकून निर्माण करणारी आणि आत्मविश्वास देऊ न शकणारी शिक्षण पद्धती त्यांना पसंत नव्हती. सर्वांगीण विकासाबरोबरच स्वतःच्या पायावर उभे करणारे आणि आत्मनिर्भर करणारे शिक्षण त्यांना अभिप्रेत होते. शिक्षणातून त्यांना व्यक्तीच्या चारित्र्य विकासाबरोबर मनाचे सामर्थ्य वाढवणारे स्वतःच्या पायावर उभे करणारे शिक्षण अभिप्रेत होते. शारीरिक शिक्षणावर ते विशेष भर देतात. शरीर मन आणि आत्मा यांच्या समग्र विकासातून माणूस घडण्यास मदत होईल असा त्यांना विश्वास होता. ते म्हणतात गीतेच्या अध्ययनापेक्षा फुटबॉल खेळून तुम्ही स्वर्गाच्या अधिक जवळ जाल, तुमच्या मनगटात अधिक बळ आल्यास तुम्हाला गीता अधिक चांगली समजू शकेल.शेवटी सांगायचे तर, आजचा युवक स्मार्ट आहे पण, स्वामी विवेकानंदाचे विचार स्वीकारले तर तो स्मार्ट सोबत सशक्त, संस्कारक्षम आणि राष्ट्रनिर्मिता बनेल म्हणजेच टेक्नॉलॉजी भविष्य घडवते पण विचार इतिहासच घडवतात.

**डॉ.अश्विनी करपे (कदम)**
**सहशिक्षिका,द्वा.मंत्री राजस्थानी विद्यालय, बीड**

# खांबा ग्रामस्थांची श्री क्षेत्र भगवानगडासाठी जाहीर केलेली १ कोटी ५ लाख रूपये देणगी जमा



भगवानगड दि ११ (प्रतिनिधी)-श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपुर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपुर्द करतात.श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे खांबा (ता.शिरूर जि.बीड) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या संपूर्ण आकडेवारीची एकूण गोळाबेरीज ही १ कोटी ५ लाख रुपये झाली.श्री क्षेत्र भगवान गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी खांबा ग्रामस्थांनी मागील वर्षी जाहीर केलेली देणगी अवघ्या एकाच तासात श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी बाबांकडे सुपूर्द केली. यावेळी श्रीगुरु शास्त्रीजींनी ग्रामस्थांचे कौतुक करून आभार मानले.देणगीमध्ये भगवानगडाच्या उपसंस्थानचाही वाटाखांबा या गावामध्ये ऐश्वर्यसंपन्न संत श्री भगवानबाबा यांनी *ज्ञानेश्वरी आश्रम* नावाने एक संस्थान स्थापन केलेले आहे. भगवानगडाचेच हे उपसंस्थान असल्याने या संस्थानच्या वतीने श्रीगुरु शास्त्रीजींनी स्वतः एक लाख रुपयांची देणगी जमा केली.

# निर्वेसनी व उत्पन्नानुसार खर्च असेल तरच आपले नीट राहील अर्थवेवस्थापन-डॉ.देशमुख

माजलगाव दि ११ (प्रतिनिधी)-शेती उद्योग सेवाक्षेत्र यावर अर्थवेवस्था आधारित असतेभारतात द्विदल अर्थवेवस्था आहे भारतात खेडे ६ लाख तर महाराष्ट्रात ४१ हजार खेडी , ग्रामीण अर्थवेवस्था शेती, निसर्गावर अवलंबून आहे .खेड्यात भौतिक सुविधा नाहीत,लोकांनी आता परंपरागत विचार सोडले पाहिजेत समाजजीवनात खर्च जास्त,प्रदर्शन प्रभाव जास्त,जातीप्रभाव जास्त,असलेला आढळतो. खर्च आणि उत्पन्न याचा मेळ बसत नाही. वाईट रूढी परंपरा नष्ट करा . शेतीला जोडधंदा आवश्यक,शेतीच्या मालाची किंमत तुम्ही ठरवणारा नाही. उत्पन्नावर बचत केली पाहिजे.शेतीपूरक वेवसाय केले पाहिजेत.सरकारची भूमिका दुटप्पी आहे.सावकाराकडून कर्ज काढू नका.अनावश्यक वस्तू घेऊ नका .तरच अर्थवेवस्था नीट राहील. मुलांना शिक्षण द्या.खाजगीकरन वाढत आहे.सरकारी नौकऱ्या आता नाहीत.कौशल्यभिमुख शिक्षण आवश्यक.पारंपरिक शिक्षण दिले पाहिजे .वेसण लागणार नाही याची काळजी घ्या.उत्पन्नानुसार खर्च करा.तरच आपल्या घराचे अर्थवेवस्थापन नीट होईल आशा प्रकारे डॉ देशमुख यांनी लोकांना त्यांच्या जीवनातील उदाहरणे देऊन ग्रामीण अर्थवेवस्थापन हा विषय समजून सांगितला डॉ प्रेम राठोड यांनी पाणी आडवा पाणी जिरवा याबाबत माहिती सांगून पाणिवेवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ दीपक कदम म्हणाले आर्थिक बचतीची सवय ही यशस्वी जीवनासाठी महत्वपूर्ण बाब आहे . सूत्रसंचालन डॉ अशोक होके प्रास्ताविक डॉ शिवशंकर मिटकरी आभार डॉ ज्ञानेश्वर गवते यांनी केले.

# महिलांची सुरक्षा ही समाजाची सामुहिक जबाबदारी-प्रा.सौ.रकटे



पाटोदा दि ११ (प्रतिनिधी)- महिलांची सुरक्षा ही समाजाची सामुहिक जबाबदारी आहे ! असे प्रतिपादन ग्रंथपाल प्रा.सौ.ज्योती रकटे यांनी केले.त्या मौजे बांगरवाडी ता.पाटोदा येथे जयभवानी महाविद्यालयाच्या रासेयो च्या युवक विशेष शिबीरात प्रमुख वक्त्या म्हणुन बोलत होत्या.

पुढे बोलतांना म्हणाल्या की महिला कोणत्याच क्षेत्रात सुरक्षित नाहीत,कुटूंब, शासकीय कार्यालय, सार्वजनणीक ठिकाणे आदि ठिकाणी महिला सुरक्षित नाहीत.त्यासाठी कठोर कायदे ही करण्यात आले आहेत परंतु त्याची योग्य अमलबजावणी होत नाही.व त्यासंबधी जनजागृती होताना दिसत नाही.तेव्हा महिलांची सुरक्षा ही समाजाची सामुहिक जबाबदारी आहे.ती समाजाने घ्यावी असे शेवटी त्यांनी अहवान केले.व भयभीत मनस्थितीमुळे महिलांचे आरोग्य धोक्यात येते.म्हणुन महिलांनी ही आत्मसुरक्षा करुन आपले मनोधैर्य व मनोबल वाढवणे गरजेचे आहे.तसेच स्वसंरक्षण करणे आवश्यक आहे.अशी अपेक्षा व्यक्त केली.या बौध्दिक सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ.वंदन जाधव हे होते.तर व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक,कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे,प्रा. सतिश जरांगे,प्रा.केशव सुर्वे ,श्री.दिपक जावळे, मुख्याध्यापक .राख आदिची उपस्थिती होती.या नंतर ग्रंथालय विभागाच्या वत्तीने ग्रंथालय आपल्या दारी उपक्रम राबविण्यात आला.भव्य ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले.यात विद्यार्थी व ग्रामिण भागातील नागरीकांनी या ग्रंथप्रदर्शनात अनेक पुस्तकांची पाहणी केली.महिलांची सुरक्षा ही समाजाची सामुहिक जबाबदारी आहे ! असे प्रतिपादन ग्रंथपाल प्रा.सौ.ज्योती रकटे यांनी केले.त्या मौजे बांगरवाडी ता.पाटोदा येथे जयभवानी महाविद्यालया च्या रासेयो च्या युवक विशेष शिबीरात प्रमुख वक्त्या म्हणुन बोलत होत्या.महिला कोणत्याच क्षेत्रात सुरक्षित नाहीत,कुटूंब, शासकीय कार्यालय, सार्वजनणीक ठिकाणे आदि ठिकाणी महिला सुरक्षित नाहीत.त्यासाठी कठोर कायदे ही करण्यात आले आहेत परंतु त्याची योग्य अमलबजावणी होत नाही.व त्यासंबधी जनजागृती होताना दिसत नाही.तेव्हा महिलांची सुरक्षा ही समाजाची सामुहिक जबाबदारी आहे.नवनविन पुस्तकांची माहिती मिळाली.या सत्राचे संचलन प्रा. डॉ.बंडू लोखंडे यांनी केले.तर आभार प्रा.डॉ.फुन्ने सर यांनी केले.या प्रसंगी बहुसंख्य शिबीरार्थी व नागरीकांची उपस्थिती होती.हे शिबीर यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम व प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी प्रा.बंडू लोखंडे,नाटककार प्रा.बापू धोक्षे,प्रा.पापाजी चव्हाण आदि स्वंयसेवक अथक परिश्रम घेत आहेत.

# संत रविदास महाराज जयंती अध्यक्षपदी हरिभाऊ सवणे यांची निवड



माजलगाव दि.११(प्रतिनिधी:- राष्ट्रीय चर्मकार महासंघ ता.शाखा माजलगाव महत्त्वपूर्ण बैठक रविवार दि. ११ रोजी दुपारी २.०० वाजता रविदास छत्रपती संभाजी महाराज चौक माजलगाव येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते संत रविदास महाराज व वीर कंकया महाराज जयंती माजलगाव अध्यक्षपदी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांची एकमताने निवड झाली. जयंती सचिव मयूर वाघमारे, कोषाध्यक्ष रमेश जगताप, उपाध्यक्ष राधाकिसन भाळशंकर यांची यावेळी निवड करण्यात आली. या बैठकीसाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे कर्मचारी माजी जिल्हाध्यक्ष अशोक वाडेकर, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष ऍड.गणेश गवळी, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे माजी कार्याध्यक्ष सत्यनारायण उनवणे, वडवणी तालुका अध्यक्ष मधुकर ठोसर,पद्माकर कांबळे, नितीन कांबळे, प्रकाश आगवणे, सचिन वाघमारे,भगवान सोनवणे, प्रसाद वाघमोडे, संतोष पोहेकर, रणवीर काबला, अशोक सोनटक्के,विजय नरहिर,अशोक भालशंकर, विकास गायकवाड यांच्यासह अनेक समाज बांधवांची उपस्थिती होती.

# माजलगावात योगासन व प्राणायाम शिबिराचे आयोजन

## स्वामी देवव्रत सरस्वती यांचे मार्गदर्शन

माजलगाव दि.११ (प्रतिनिधी):- येथील आर्ष योग संस्थान शाखेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही योगासन व प्राणायाम शिबिराचे मंगळवार दि.१३ ते २० दरम्यान आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.येथील वैष्णवी मंगल कार्यालयात होणाऱ्या या आठ दिवसीय शिबिरात आर्य जगताचे प्रसिद्ध योग व आयुर्वेद तज्ञ आचार्य स्वामी देवव्रतजी सरस्वती यांचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे.गेल्या ३९ वर्षापासून आजतागायत माजलगाव शहर व परिसरातील नागरिकांचे माता भगिनींचे विद्यार्थी विद्यार्थिनींचे आरोग्य निरोगी राहण्याच्या उद्देश्याने आर्ष योग संस्थान अशा प्रकारचे योगासन व प्राणायाम शिबिर दरवर्षी आयोजित करीत आलेले आहे. येथे मंगळवार दि.१३ पासून दि.२० पर्यन्त दररोज सकाळी पुरुष व महिला साठी ५.३० ते ७.३० आणि विद्यार्थ्यांना सायंकाळी साडेपाच ते साडेसहा या वेळेत ही शिबीर पार पडणार आहे.तर शंख प्रक्षालन रविवार दि.१८ रोजी सकाळी ८ ते १ या वेळेत होणार आहे.योगश्चित्त वृत्तिनिरोध-चित्त वृत्तींचा निरोध ही योग आहे ,स्वस्थ व निरोगी शरीरातच स्वस्थ निरोगी मन राहते असे म्हटले जाते ,आणि स्वस्थ व निरोगी तनमन असणाराच व्यक्ती सुखी व समाधानी होऊन कुटुंब , समाज व राष्ट्र सेवा करू शकतो म्हणून सर्व समाजातील नागरिकांचे मन तन प्रसन्न व स्वस्थ निरोगी राहावे यासाठी हे संस्थान कायम प्रयत्नशील असते.शिबीरात विविध आजारावर कोणकोणती योगासने व प्राणायाम लाभदायक आहेत हे सांगितले जाईल, तसेच उच्च रक्तदाब, मधुमेह, सांधेदुखी, गुडघेदुखी इत्यादी आजारावर उपचार व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान संयोजन समितीतर्फे अनंत रुद्रवार,गोविंद बजाज, लक्ष्मीकांत सोन्नर,जयप्रकाश मलवाडे,रवींद्र खोडवे,जगदीश साखरे,अजित भावठाणकर,प्रणील चिद्रवार, बबनराव सरवदे यांनी केले आहे .



# गावचे मुलभूत प्रश्न सोडवण्याची उमर शेख यांची मागणी

घाटनांदुर दि.११(प्रतिनिधी):- येथील रेल्वे थांबा, महिलांसाठी बस स्थानक, स्वच्छतागृह, वाहतूक कोंडी, पार्किंग,अतिक्रमण, प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. व कर्मचारी यांचा तुटवडा, सोमेश्वर विद्यालय ते पशुवैद्यकीय रुग्णालय पर्यंत चा बोगस केलेला रस्ता, अण्णा भाऊ साठे चौका पर्यंतचा रस्ता व त्या रस्त्यावर झालेले अतिक्रमण, जलजिवनचे अपूर्ण काम. अशा अनेक समस्या सध्या घाटनांदुर मध्ये नांदत आहेत. या कडे लक्ष देणे गरजेचे आहे.असे मत सामाजिक कार्यकर्ते उमर भाई शेख यांनी दैनिक पार्श्वभूमी च्या पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले .



उमर शेख हे एक सामाजिक कार्यकर्ते असुन समाज कार्यात ते नेहमी अग्रेसर असतात. समाज कार्य करणे, गोरगरिबांच्या प्रश्नांवर आवाज उठवने त्यांना न्याय देण्यासाठी बोलने, प्रशासनाला जागे करणे, हे त्यांचे कार्य आहे. २०२२ साली झालेल्या ग्रामपंचायत निवडणूकीत उमर शेख हे वार्ड क्रमांक ६ येथील ग्रामपंचायत सदस्य पदाला ते उभा होते. नागरिकांनी त्यांना भरभरून प्रतिसाद देत मतांनी त्यांची ओंजळ भरली.समोर असलेला उमेदवार प्रतिस्पर्धी यांनाही नागरिकांनी भरघोस मतदान दिले. दोन्ही उमेदवारांना समान मते पडली व नंतर चिट्टी काढून विजेता ठरवण्यात आला. उमर शेख यांना जनतेने निवडून दिले पण नशिबाने हारवले. चिट्टीत त्यांचा पराभव झाला. हा त्यांचा पराभव नसुन नागरिकांनी दिलेला विजयाचा कौल होता. तेव्हा पासून समाजासाठी कार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले.मत दिलेल्या नागरिकांच्या पाठीशी बिनामतलबाने ,खंबीरपणे उभे राहु असे यावेळी त्यांनी सांगितले.घाटनांदुर गावात सध्या अनेक समस्या उद्भवत आहे. बीड जिल्ह्यात ग्रामीण भागात घाटनांदुर या गावाला निजाम कालीन पासून रेल्वे थांबा आहे. परंतु कोरोनाच्या महामारी पासून हा रेल्वे थांबा बंद झाला आहे. बंद झालेला रेल्वे थांबा पुन्हा सुरू करण्यात यावा यासाठी नेत्यांनी लक्ष घालण्याची गरज असून या प्रश्नाकडे दुर्लक्ष केलं जात आहे. गावातच प्राथमिक आरोग्य केंद्र आहे याच आरोग्य केंद्राला अवती-भवती असणारे अनेक गावे जोडले आहेत. या आरोग्य केंद्रात कर्तव्यदक्ष अधिकारी व कमी असलेले कर्मचारी यांची नेमणूक करण्यात यावी, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राला नागरिकांची होणारी गर्दी पाहून या ठिकाणी सुविधा निर्माण कराव्यात. सर्वसामान्य लोकांसाठी आरोग्य सुविधा ही खूप महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे प्रशासनाने लक्ष देऊन आरोग्य व्यवस्था सुसज्ज करण्याची गरज आहे. पेशंटची गर्दी पाहता प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालय करण्यात यावे. बसस्थानक व स्वच्छतागृहांची समस्या:- गावात मोठ्या प्रमाणावर शाळा, कॉलेज ,महाविद्यालय, व खरेदी विक्री साठी मार्केट आहे.यासाठी गाव, खेड्यातील शाळकरी मुली, महिला या गावात येतात, तसेच गावातील महिला तालुक्याच्या, जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी बस स्थानकावर वर येतात, आल्यानंतर त्यांना कोणाच्या तरी दुकानाचा आधार घेऊन दुकानासमोर दिर्घकाळ उभा राहून बसची वाट पहावी लागते. तसेच स्वच्छतागृह नसल्याने तो मोठा प्रश्न निर्माण होतो.अंबाजोगाई तालुक्यातील व परळी मतदारसंघातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण असलेल्या गावाला स्वच्छतागृह नसल्याने या गोष्टींचा त्रास महिलेला होणे ही बाब योग्य नाही.गावात अनेक भागांमध्ये रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. गावातून जाणारा मुख्य रस्ता छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तपेश्वर नगर व ग्रामपंचायत कार्यालय ते अण्णाभाऊ साठे चौक या रस्त्याचे अत्यंत दैनि अवस्था अवस्था झालेली पाहायला मिळत आहे. तसेच काही भागात गेल्या १५ते २० वर्षांपुर्वी पासून रस्तेच केले नाहीत. अनेक वर्षापासून लोक इथं वास्तव्य करत आहेत. पाण्याची सोय आहे;मात्र सांडपाण्यासाठी गटारांची गरज आहे. रस्ते नसल्याने गटारी नाहीत. त्यामुळे रस्त्यातून सांडपाणी वाहते, या समस्यांचा सामना शाळेत जाणाऱ्या शाळकरी विद्यार्थ्यांना व नागरिकांना करावा लागत आहे.शासनाना च्या वतीने राबविण्यात आलेली जलजीवन योजना ही घाटनांदुर येथे ११ कोटी रुपयांची ही मंजूर झाली आहे.ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते या योजनेचा शुभारंभ झाला होता. मात्र, गेली तीन वर्षे झालं या योजनेचे काम अद्यापही पुर्णपणे झालेले नाही. गावात ठिकठिकाणी पाईपलाईन साठी केलेले खोदकाम तसेच ठेवण्यात आले आहे .जलजीवन मुळे रस्त्याचे झालेले विद्रूपीकरण याला जबाबदार कोण गुत्तेदार का प्रशासन ? ज्यांच्या हस्ते या कामाचा शुभारंभ झाला त्यांनी तरी या कामात लक्ष घालून हे काम पूर्ण झाले की नाही याची चौकशी करणे सध्या गरजेचे झाले आहे.घाटनांदुर गावाला अंबलवाडी- पुस योजनेचे पाणी सध्या तरी चालू आहे. गेली अनेक वर्षापासून गावाला, गावातील नळाला पाणी आले नाही.पण महावितरणाच्या मिटरची रीडिंग काही थांबली नाही. या योजनेवर अफाट लाईट बिलाची बाकी. महावितरण कडून वारंवार बील भरण्यासाठी लाईट खंडित केली जात आहे. २०१७ पासून या गावाला अंबलवाडी- या योजनेच पाणी आले. सरपंच महेश अप्पा गारठे यांनी या पाईपलाईन वरची ठिकठिकाणी असलेली गळती थांबवून जुन्याच योजनेवर सध्या गावाला पाणीपुरवठा देत आहेत. त्याबद्दल त्यांचे आभार. तरी जलजीवन च्या संबंधित अधिकाऱ्यांनी व मंत्र्यांनी, आमदारांनी लक्ष घालून ही योजना लवकरात लवकर सुरू करावी अशी मागणी होत आहे.गावचा विस्तार होत आहे. त्याच्या सीमा ही विस्तारत आहेत. आज शहरालगतच्या ग्रामीण भागात लोकवस्ती वाढत आहे. ही बाब चांगली असली तरी तिथल्या सेवा पुरवणाऱ्या व्यवस्थांवर मर्यादा येत आहेत. प्रशासनाने अशा ग्रामीण भागासाठी अधिकचा निधी किंवा सेवा पुरवण्यासाठी उपाय योजले पाहिजेत. घाटनांदुर सारख्या गावच्या एकीकडे विकास होत आहे; पण दुसरीकडे काही प्रश्न सुटत नाहीत, याबाबत ग्रामीण प्रशासनाने लक्ष द्यावे. मतदारसंघाच्य नेत्यांकडून विकासाचा डोंगोरा पिटला जात आहे;मात्र गावात रस्त्याची दुरावस्था,जलजीवन ची मंदगती, आरोग्यसेवा नागरिकांची धावपळ, अतिक्रमण, वाहनांची गत्ती , स्वच्छतागृह महिलांची फजिती अश्या अनेक समस्या पाहिल्या तर आपण किती मागे आहोत हे कळतं आहे. गावच्या सिमा विस्तारल्या तरी पायाभूत सुविधांचे प्रश्न अद्यापही सुटलेला नाहीत. सध्या जि. प. पं. स. निवडणुकि चे वारे वाहत आहेत. येणाऱ्या काही महिन्यात निवडूका लागतील. राजकीय पक्षांनी धनदांडग्यांना तिकीट देण्या पेक्षा सर्वसामान्यांना व स्वच्छ प्रतिमा असलेले चेहरे निवडणुकीत उभा करावेत. जे उमेदवार निवडून आल्यानंतर तळमळीने जनतेचे प्रश्न सोडवतील त्यांनाच संधी द्यावी; निवडून ही विकासावर व्हावी असे मत यावेळी उमर शेख यांनी व्यक्त केले.



# चक्कर

एका ६० वर्षीय आजी विश्व हॉस्पिटलमध्ये अत्यंत भीतीच्या अवस्थेत आल्या होत्या. त्यांच्या मानेला एक पट्टा देखील होता त्यांना विचारले आजी बाई काय होते ?

तेव्हा त्या म्हणाल्या काय सांगू डाक्टर साहेब, माझी लई मान दुखती सारखी चक्कर पण येती, चालताना तोल जातो म्हणून मानेला हा पट्टा लावला लई लाज वाटती ! लावायला जावई इवाई हैती मला त्यांच्या समोर पण जात नाही.म्या कुठल्या लग्ना कार्यात जायची पण चोरी हाय देव देव करते तेवढ फकस्त !

एका कीर्तनाला गेली होती तिथ असच एका पोरीला बोलत हुते तवा समजल की मान दुखी आणि घेरी (चक्कर ) पट्टा लावून नाही राहत मणका, मान आणि मेंदू चा डाक्टर असतो त्यांना दाखवा म्हंजी गुण येईल . मग तिने तुमचा पत्ता दिला म्हणून इथ आले आणि पुढे सांगू लागली. ‘‘डॉक्टर, मी झोपले की चक्कर येते. रात्र रात्र झोप लागत नाही. झोपेतच काही होईल का ? मी मरणार तर नाही ना ? काही मोठा आजार तर नाही ना ?’’आजी इतक्या घाबरल्या होत्या की ओपीडीतील तपासणीसाठी असलेल्या बेडवर झोपायलासुद्धा त्या घाबरत होत्या. ‘‘डोकं फिरायला लागेल’’, ‘‘काहीतरी वाईट होईल’’ अशी भीती त्यांच्या मनात सतत होती. सविस्तर तपासणी व MRI केल्यानंतर लक्षात आले की त्यांनाही कानातील समतोल बिघडल्यामुळे होणारी चक्कर (BPPV) होती. त्यांना शांतपणे समजावून सांगितले, योग्य व्यायाम व औषधोपचार सुरू केले.

काही दिवसांनी त्या आजी स्वतः हॉस्पिटलमध्ये चालत येऊन म्हणाल्या – ‘‘डॉक्टर, आता मला अजिबात भीती वाटत नाही. शांत झोप लागते. चक्करही बंद झाली आहे. मनातून सगळी भीती गेली आहे. आता मी खूप खुश आहे.’’ (आणि हो त्यांचा पट्टा या वेळेला न्हवता त्यांच्या मानेला) हा अनुभव सांगताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास आणि आनंद पाहून आम्हालाही समाधान वाटले. चक्कर येणे ही एक सामान्य पण अनेक रुग्णांच्या मनात भीती निर्माण करणारी तक्रार आहे. ‘‘डोकं फिरतंय’’, ‘‘जमीन हलतेय’’, ‘‘झोपल्यावर चक्कर वाढते’’ अशा तक्रारी घेऊन रुग्ण आमच्याकडे येतात. अनेकदा चक्कर ही स्वतः आजार नसून कुठल्यातरी कारणामुळे निर्माण झालेले लक्षण असते, हे समजून घेणे गरजेचे आहे.

### चक्कर येण्याची प्रमुख कारणे

१. कानाशी संबंधित BPPV (सर्वात सामान्य) कानातील इन्फेक्शन, Ménière's disease
२. रक्तदाब लो बीपी,अचानक उभे राहिल्यावर चक्कर
३. रक्ताची कमतरता (ॲनिमिया)
४. साखर कमी होणे
५. मान मणक्याचे आजार
६. ताण, चिंता, भीती, झोपेचा अभाव
७. क्वचित मेंदूशी संबंधित कारणे
८. डोकेदुखी, मायग्रेन (अर्धशिशी)

**रुग्णांच्या मनातील शंका – कुशंका**

* चक्कर आली म्हणजे काही मोठा आजार आहे का ?
 – बहुतांश वेळा साधे आणि बरे होणारे कारण असते.
* झोपेत चक्कर येते म्हणजे धोका आहे का ?
 – बहुतेक वेळा नाही. योग्य उपचारांनी ती सुरक्षितपणे बरी होते.
* चक्कर आली म्हणजे मरण येईल का ?
 –हा एक गैरसमज आहे. भीतीमुळे लक्षणे वाढतात.

**चक्कर येताना काय काळजी घ्यावी ?**

अचानक उठणे टाळा, चक्कर असताना वाहन चालवू नका, पुरेसे पाणी प्या, उपाशी राहू नका, झोप पूर्ण घ्या, डॉक्टरांनी सांगितलेले व्यायाम नियमित करा.

**चक्करविषयीचे गैरसमज ?**

चक्कर म्हणजे कायमचा आजार, चक्कर आली की लगेच काहीतरी वाईट होईल, भीती वाटते म्हणून तपासणी टाळावी
हे सर्व गैरसमज आहेत.

**डॉक्टरांचा सल्ला**

चक्कर येणे ही तक्रार दुर्लक्षित करू नका, पण भीतीपोटी त्रास वाढवूही नका. योग्य तपासणी, समजावणी आणि उपचार केल्यास रुग्ण पूर्णपणे पूर्ववत आयुष्य जगू शकतो.

हे वरील अनुभव त्याचे उत्तम उदाहरण आहेत.



**डॉ.विशाल पिंगळकर**
(न्युरो सर्जन )
**विश्व हॉस्पिटल, बीड**
संपर्क – ८२०८९५२४४२

# अस्थिव्यंग निवासी विद्यालय नेकनूरचे जिल्हास्तरीय दिव्यांग मूला-मुलींच्या क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश



नेकनूर दि ११(प्रतिनिधी)– जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बीड , जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बीड व सौ. सुमतीबाई गुणाले शिक्षण प्रसारक मंडळ,धानोरा, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमानाने दि. ०७ जानेवारी ते ०९ जानेवारी २०२५ अंबाजोगाई येथे दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय मुला मुलींच्या क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेत परिवर्तन सेवाभावी संस्था संचलित अस्थिव्यंग निवासी विद्यालय नेकनुर, शाळेने एकूण २१ पारितोषिक मिळवत जिल्ह्याचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. या स्पर्धेमध्ये विविध प्रकारच्या दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या अनुक्रमे प्रथम , द्वितीय, आणि तृतीय असे एकूण २१ पदकांची कामगिरी केली. यामध्ये सॉफ्ट बॉल थ्रो, व्हील चेअर रेस, गोळा फेक एक कुबडी धावणे व धावणे या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतःचे मनोबल वाढवत अथक प्रयत्नातून या स्पर्धेमध्ये घवघवित यश संपादन केले. प्रथम पारितोषिक – कु.माधवी राठोड, पूनम रुपनर, योगिता खटाने, प्रतीक्षा मुंडे, रूपाली जाधव, शिवानी चव्हाण चि. विशाल राठोड, सुरज काळे , पदमराज रोकडे, द्वितीय पारितोषिक – चि. कार्तिक मुळे, प्राची पवार, माधवी राठोड चि. राहुल राठोड , उमेश राठोड , तृतीय पारितोषिक – चि. इजेश्वर साबळे. सन्माननीय जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील व वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता अंकुशराव नखाते ,आयोजक दिनकरराव गुणाले मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गुणगौरव केला व राज्यस्तरीय स्पर्धेत विविध स्पर्धेत यश संपादन करावे अशा शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी शाळेच्या क्रीडा शिक्षिका श्रीमती गर्जे एम. डी. यांचे सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. तसेच या स्पर्धेमध्ये खडके व्ही. एस. कानडे के. एन. श्रीमती बुराणे एस. जी. यांनी परिश्रम घेतले. परिवर्तन सेवाभावी संस्था, नेकनूर संस्था अध्यक्ष तसेच आमचे मार्गदर्शक बाळकृष्णजी खारके व सचिव नंदकिशोर कांकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक सन्माननीय श्री भोंडवे एस.वाय. यांनी दिव्यांग मुला मुलींचे कौतुक व अभिनंदन केले.

## खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचा १०० % निकाल इंटरमिजिएट मध्ये सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण

अंबाजोगाई (प्रतिनिधी) : येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागामार्फत कला संचालनालय मुंबई तर्फे घेण्यात येणा–या शासकीय ग्रेड परीक्षा एलिमेंटरी व इंटरमेजिएट (चित्रकला) २०२५ च्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील एलिमेंटरी परीक्षेस ९४ विद्यार्थी होते – ग्रेड मध्ये ५६, इ ग्रेड २२, उ ग्रेड १६ असे एकूण ९४ एलिमेंटरी चा निकाल १००% तसेच उच्च स्तर परीक्षा इंटरमेजिएट परीक्षेमध्ये ला शिक्षक श्री उमेश डोंगे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे, कार्यवाह किरण कोदरकर, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष अविनाशजी मुडेगावकर, मुख्याध्यापक आनंतराम कोपले, शालेय समितीचे सर्व सदस्य, उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे, पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे, पर्यवेक्षक रूपाली मुळे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## राजस्थानी विद्यालयातील विद्यार्थ्यांचा आनंदोत्सवात बालपण जागृत – उपाध्यक्ष ओमप्रकाश मानधने



माजलगाव दि ११ (प्रतिनिधी)– शहरातील वरद राजस्थानी प्राथमिक विद्यालयामध्ये आनंद नगरी हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये आनंद, सहकार्य, व्यवहारिक ज्ञान , व खरी कमाई काय आहे इत्यादी जीवन कौशल्यांचा विकास घडविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या आनंद नगरीत इयत्ता दुसरी ते पाचवी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी व पालकांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी तयार करून आणलेले विविध खाद्यपदार्थ उपस्थितांचे खास आकर्षण ठरले. याप्रसंगी माहेश्वरी शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.आर .जी .बजाज संस्था सचिव रामानंद लड्डा यांच्या सूचनेनुसार व,उपाध्यक्ष मा. ओमप्रकाश मानधने कोषाध्यक्ष रमेशचंद्र कासट माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक चंद्रशेखर तौर यांच्या उपस्थितीत शाळेच्या प्राथमिक विभाग अंतर्गत आनंद उत्सव साजरा करण्यात आला यामध्ये १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता मुख्याध्यापिका सारिका तौर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

## जय मातादी डेव्हलपर्स संचलित ज्ञानगुरू शैक्षणिक मार्गदर्शन केंद्राचा शुभारंभ –गणेश खरात



बीड (प्रतिनिधी):– बीड शहरात भव्य असे ज्ञानगुरू शैक्षणिक मार्गदर्शन केंद्राचा शुभारंभ राष्ट्रमाता मा जिजाऊ यांच्या जयंती दिवशी म्हणजेच १२ जानेवारी रोजी होणार आहे. या ज्ञानगुरू शैक्षणिक मार्गदर्शन केंद्राचा शुभारंभ मराठा संघर्ष योद्धा मा. मनोजदादा जरांगे पाटील व नारायण गडाचे उत्तर अधिकारी ह. भ. प.संभाजी महाराज यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, उमाकिरण शैक्षणिक संकुलन, जय मातादी ग्राउंड फ्लोअर पांगरी रोड बीड येथे,पुणे येथील सुप्रसिद्ध कौन्सिलर प्रा. रवींद्र साळुंखे सर,बीड येथील प्रा.राजेश भुसारी, प्रा. वंदना भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञान गुरू कौन्सिलिंग चा शुभारंभ बीड शहरात होणार आहे आता विद्यार्थ्यांना कौन्सिलिंग साठी लातूर संभाजीनगर सहित्र जाण्याची गरज नसून अनुभवी व तज्ञ लोक आपल्या शहरांमध्ये उपलब्ध असणार आहेत.

MBBS & BDS & BAMS & BHMS & BPT & BVSC & Nursing. (PG)-MD DNB & MDS & Fellowship & DM. (UG) Agriculture & Pharmacy & Engineering & LAW & (PG)-MBA & MCA & ME सह प्रत्येक शैक्षणिक फील्ड करता मार्गदर्शन केले जाणार आहे या ज्ञानगुरू कौशलिंग चा शुभारंभ सोमवार दि. १२ जानेवारी २०२६, स.१० वा.आयोजित केला आहे. उद्घाटक म्हणून मराठा संघर्ष योध्दा मा. मनोज (दादा) जरांगे पाटील, ह.भ.प. संभाजी महाराज (उत्तराधिकारी, श्रीक्षेत्र नारायणगड) तरी या शुभारंभ बीड जिल्ह्यातील शिक्षण प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक गणेश खरात यांनी केले आहे.

# राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त गेवराईत मानवतेचा महायज्ञ

**१०० रक्तदाते करणार रक्तदान**

गेवराई दि ११( प्रतिनिधी ) राजमाता राजमाता जिजाऊ जयंतीच्या पवित्र पर्वावर गेवराईत मानवतेच्या सेवेचा दीप प्रज्वलित होत असून, रक्तदान, व्यसनमुक्ती, अवयवदान जनजागृती व अन्नछत्र अशा बहुआयामी सामाजिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. तुम्ही–आम्ही गेवराईकर, गेवराई व्यापारी महासंघ, गेवराई किराणा व्यापारी संघटना आणि आसरा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम मागील १० वर्षपेक्षा जास्त कालावधी पासून केला जात आहे . सोमवार, १२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत माँ संतोषी पेट्रोल पंप, दत्तराज पार्क समोर, बीड–छत्रपती संभाजीनगर बायपास रोड, गेवराई येथे पार पडणार आहे. ही केवळ जयंती नसून संस्कारांची आठवण, स्वाभिमानाची साद आणि राजमाता जिजाऊंच्या विचारांना दिलेली जिवंत मानवंदना असल्याचे आयोजकांनी नमूद केले. आज दिलेले रक्त उद्या कुणाच्या तरी आयुष्याला नवे श्वास देईल, आज सोडलेले व्यसन उद्या एका कुटुंबाचे भविष्य उजळवेल, तर अवयवदानाची नोंदणी मृत्यूनंतरही जीवन देईल, असा संदेश या उपक्रमातून देण्यात येत आहे. या निमित्ताने रक्तदान शिबीर, जीवनरक्षक सेवेसाठी व्यसनमुक्ती शिबीर, समाजाला अंधारातून प्रकाशाकडे नेण्यासाठी अवयवदान जनजागृती व नोंदणी – मृत्यूनंतरही जीवन देण्याची प्रेरणा

**अन्नछत्र –** सिंदखेड राजा येथे जाणाऱ्या जिजाऊ भक्तांसाठी नाश्त्याची व्यवस्था .असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

आतापर्यंत २४ पेक्षा अधिक दात्यांनी स्वाभिमानाने रक्तदानाची नोंदणी केली असून मिशन १००+ हे उद्दिष्ट गाठण्यासाठी व्यापारी बांधव व शिवप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. रक्तदान इच्छुकांसाठी मो ९३२६२६२५८५ या क्रमाकावर व्हॉट्सप ग्रुपद्वारे नोंदणीची सोय उपलब्ध आहे.

**खास आकर्षण :**प्रत्येक रक्तदात्यास गोपी नमकीन (बीड), सुरुची मसाले (नागपूर), झर्रिकर मसाले (परभणी), विक्रम टी (जालना), अभिजया मसाले (परभणी) आणि प्रथमेश मसाले (पुणे) यांच्या उत्पादनांचे आकर्षक गिफ्ट किट सप्रेम भेट देण्यात येणार आहे.आयोजकांनी सांगितले की, आपल्या सर्वांची उपस्थितीच आमची शक्ती असून, आपला सहभागच आमचा अभिमान आहे. रक्तदानासाठी सिव्हील हॉस्पीटल बीड येथील ज्योतिबा काळे व जीवन ज्योती रक्तपेढीचे बालाजी पवार व टीम चे सहकार्य लाभणार आहे .

## के.एस.पी.विद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा

बीड (प्रतिनिधी)– दि.१०/०१/२०२५ रोजी के.एस.पी. विद्यालय, बीड येथे दर वर्षा प्रमाणे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहत साजरे करण्यात आले. या कार्यक्रमास इयत्ता १ ली ते ९ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी, सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी आयोजित केलेला वार्षिक उत्सव, जो विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव असतो आणि समाजालाही जोडतो. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि समाज यांच्यात संबंध दृढ होण्यास मदत झाली.

सर्व विद्यार्थ्यांनी कला गुण साजरीकरणातुन उपस्थिताचे मने जिंकले. उपस्थितीत मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जगदीश शिंदे, भाऊसाहेब वाघमारे, दिनेश दोडके यांनी केले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती ए पी आय डंबाळे साहेब, पोलिस निरीक्षक, भाकरे साहेब, शिवाजी नगर पोलिस स्टेशन, बीड , प्रा. जे.पी. शेळके ,एमॅच्युअर खो–खो असोसिएशन बीडचे अध्यक्ष, श्री. ऋषिकेशजी शेळके, सौ.अंजलीताई शेळके, शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पालक यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला.


## जाहीर प्रगटन

बीड जिल्ह्यातील जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचीत करण्यात येते की, मी नामे **माणिक गोरख जाधव** रा. पेंडगांव, ता.जि. बीड खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देतो की, **रूक्मीणबाई शहादेव घोलप** रा. शुक्रवार पेठ बीड, ता.जि.बीड यांचे मालकी व ताब्यातील र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स. व ता. बीड मौजे बहिरवाडी ग्रामपंचायत हद्दीचे आतील सर्व्हे नंबर १३/ई तरफ बहिरवाडी ज्याचा मिळकत क्र. नवा २८५२ व जुना ७४३५ असा आहे. प्लॉट ज्याची साईज पुर्व पश्चिम २५ व दक्षिण उत्तर ५० फुट आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ १२५० चौरस फुट आहे.

**ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.**
**पुर्वेस:** अरूण गोरे यांचा प्लॉट, **पश्चिमेस :** विठ्ठलराव यांचा प्लॉट
**दक्षिणेस :** अरूण गोरे यांचा प्लॉट, **उत्तरेस :** १५ फुट रूंदीचा रस्ता

वरील चतुःसिमेअंतर्गत येणारी मिळकत रूक्मीणबाई शहादेव घोलप यांचेकडुन मी वर नमुद मिळकत खरेदी करण्याचा करार केला आहे. त्याचा ईसारपावती दस्त क्र. ६९९१/२०२५ दिनांक ११/११/२०२४ असा आहे.

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर जमीन / प्लॉट मिळकत खरेदीखताबाबत कसल्याही प्रकारचा व्यवहार जसे की, तोंडी व्यवहार अथवा लेखी स्वरुपात ईसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, आम मुखत्यारपत्र, दिवाणी व फौजदारी वाद, कर्ज बोजा, वाटणी, हिबानामा, व सदर जमीन मिळकती मध्ये कोणाचा वडिलोपार्जीत हिस्सा असेल किंवा इतर कोणत्याही स्वरुपाचे कोणतेही व्यवहार, कुळ अथवा वाद असल्यास ०४ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासोबत खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा.

०४ दिवसात या संदर्भात काही आक्षेप न आल्यास आम्ही सदरील जमीन मिळकत निर्विवाद आहे असे समजुन या मळकतीचे रितसर खरेदीखत माणिक गोरख जाधव यांचे किंवा त्यांचे कुटुंबातील व्यक्तीच्या नावे करुन देण्यात येईल, त्या नंतर कोणतीही तक्रार अथवा आक्षेप मान्य होणार नाही.

सबब हे जाहीर प्रगटन.
बीड
दिनांक : ११/०१/२०२६

जाहीर प्रगटन देणार
**माणिक गोरख जाधव**
मो.नं.९५२९५८९७१२

16485



## जाहिर नोटीस

तमाम लोकांस तसेच विशेषतः मौजे बिड आणि मौजे बार्शी येथील लोकांना सदरील जाहीर नोटिशीद्वारे सूचित केले जाते की –

अधिकृत अधिकारी जनता सहकारी बँक लि. धाराशिव यानी दिनांक २१.१२.२०२५ रोजीच्या दैनिक लोकसता आणि दैनिक दी इंडियन एक्स्प्रेस मध्ये दिनांक २०.१२.२०२५ रोजीची फेर जाहीर लिलाव नोटीस प्रसिद्ध करून आमचे अशीलांच्या मालकीचे खालील अनुसूचीत नमूद केलेल्या मालमत्तांची लिलाव विक्री दिनांक १२.०१.२०२६ आणि १६.०१.२०२६ रोजी नेमलेली आहे.

सदरील प्रकरणात बँकेने सुरू केलेली वसुलीची कारवाई ही चुकीची, बेकायदेशीर आणि सिक्युरिटायझेशन कायद्यातील तरतुदींनुसार नसल्याने त्यविरोधात आमचे अशिलांनी यापूर्वीच पुणे येथील कर्ज वसुली प्राधिकरणासमोर दावा क्र. ११७/२०२४ दाखल कलेला असून, सदरील २०.१२.२०२५ रोजीच्या बेकायदेशीर फेरलिलाव नोटीशीविरुद्ध आमचे अशिलानी उपरोक्त दाव्यात अंतरिम अर्ज क्र. ३८/२०२६ आणि ३९/२०२६ दाखल केलेले असून त्या संदर्भात मे. कर्ज वसुली प्राधिकरणासमोर सदरील अंतरिम अर्जाचे सुनावणीकामी दिनांक १२.०१.२०२६ आणि १६.०१.२०२६ या तारखा नेमण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त परिस्थितीत, जर सदर अनुसूचीत नमूद केलेल्या मालमत्तांची विक्री झाली, तर ती आमचे अशिलांनी दाखल केलेल्या उपरोक्त नमूद सिक्युरिटायझेशन दाव्यातील अंतिम निकालाच्या तसेच अंतरिम अर्जावर होऊ घातलेल्या आदेशाचे अधीन असतील याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त नमूद परिस्थिती लक्षात घेता, सर्वसामान्य जनता व विशेषतः लिलावात सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या सर्व संबंधित व्यक्तींनी आमचे अशीलांनी दाखल केलेला सिक्युरिटायझेशन दावा आणि त्यातील अंतरिम अर्जावर होऊ घातलेल्या आदेश इत्यादींची योग्य ती नोंद घ्यावी व या प्रकरणात आवश्यक ती खबरदारी घ्यावी किंबहुना सदर सूचनेचा एकमेव उद्देश तमाम जनतेस व इच्छुक खरेदीदार पक्षांना वरील बाबींची माहिती देणे हाच आहे.

**मालमत्तेची अनुसूची**

१. मौजे बीड येथील नगर पंचायत घर क्र. १–६–१२८५ यांशी क्षेत्र २२९.७७ चौ. मी.
२. मौजे बार्शी येथील गट क्र. ८४३, यांशी क्षेत्र हेक्टर ०६.८६ आर.

म्हणून ही खबरदारीची सूचना देण्यात येत आहे.
**ठिकाण :** पुणे
**दिनांक :** १०.०१.२०२६

ॲड.एन.के.खासबारदार, ॲड.प्रसाद कुलकर्णी,
ॲड.आदर्श जांगडा, ॲड.कस्तुरी जांगडा, ॲड.झिनल ठक्कर

16486


# पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा येथे आनंदनगरी उत्साहात




माजलगाव दि.११ (प्रतिनिधी) : येथील जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा माजलगाव येथे आनंदनगरी (र्त्रीप त्र्ग्रळी २०२६) चे थाटात उद्घाटन नगराध्यक्ष श्रीमती महरीन शिफा बिलाल चाऊस यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी वार्डातील नगरसेवक सय्यद सज्जाद व जुनेद खान यांची प्रमुख उपस्थिती होती. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेख अब्दुल, मुख्याध्यापक मिलिंद गरबडे, मुलांची शाळा माजलगाव चे मुख्याध्यापक शेख मंजूर हे आवर्जून उपस्थित होते.

याप्रसंगी शाळेच्या वतीने सर्व मान्यवरांच्या हस्ते जिल्हा शिक्षक पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक शेख मंजूर,माध्यमिक शिक्षक शरद नायबळ व कनिष्ठ सहाय्यक म्हणून पदोन्नती झालेले गोरख उघडे यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. सोमेश्वरी टाक व अंजली कुंभार यांनी नगराध्यक्ष शिफा मॅडम यांचे अतिशय सुरेख चित्र रेखाटल्याने त्यांचाही सत्कार करण्यात आला. आनंद नगरीमध्ये पहिली ते दहावीतील विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन विविध अन्नपदार्थ व मजेदार खेळ यांचे ३० स्टॉल लावण्यात आले होते. विद्यार्थिनींनी अतिशय आनंदी वातावरणात या खेळांचा व खाऊंचा आस्वाद घेत खरेद केली व सहभाग घेतलेल्या मुलींनी विक्रीतून नफा कमविला. विद्यार्थिनींना या आनंदनगरीतून व्यवहाराचे खरे धडे मिळाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद नायबळ यांनी तर आभार प्रदर्शन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेख अब्दुल यांनी केले. बाळासाहेब सोनसळे यांनी आपल्या प्रास्ताविकात पाहुण्यांचा परिचय व शाळेची तोंड ओळख सर्वांना करून दिली. मुख्याध्यापक मिलिंद गरबडे यांनी अध्यक्षीय समारोपात नूतन नगराध्यक्ष व नगरसेवक त्याचप्रमाणे जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षक यांचे अभिनंदन केले व विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सहशिक्षिका मंदा सारूक, ज्योती कोडगिरकर, जयश्री लोणीकर, संगीता राठोड, संगीता शिंदे, अंबिका कुचेकर,शितल राठोड, हिरा मगर तसेच सहशिक्षक सुंदर काळे,नारायण भालशंकर,चंद्रकांत यादव, बालासाहेब कांबळे, हनुमान शेरकर, संतोष साळवे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# पार्श्वभूमी

दि.१२ जानेवारी २०२६ सोमवार




## यशवंत विद्यालय कुर्ला ची शैक्षणिक सहल उत्साहात

बीड दि.११ (प्रतिनिधी)- आदर्श शिक्षण संस्थेचे यशवंत विद्यालय कुर्ला ची शैक्षणिक सहल ९जानेवारी ते ११जानेवारी या कालावधीत उत्साहात पार पडली कुर्ला येथून प्रस्थान झालेली सहल सुरवातीला संत ज्ञानेश्वर महाराज यांचे जन्म ठिकाण आपेगाव येथून पैठण येथे नाथ मंदिर करुन संभाजीनगर येथे सिद्धार्थ उद्यान बेबीचा मकबरा पवनचक्की देवगिरी किल्ला नंतर भद्रमारुती मुक्काम करुण बारा ज्योतीलिंगापैकी एक

पान २ वर

## धारूरचे माजी उपनगराध्यक्ष जितेंद्र महामुनी यांना मातृशोक



किल्ले धारूर दि ११ ( प्रतिनिधी)-धारूर च्या सोनार समाजातील जेष्ठ नागरीक कांताबाई चंद्रकांत महामुनी वय ८५ वर्ष यांचे अल्पशाह आजाराने शनिवार दि १० जानेवारी रोजी पहाटे निधन झाले. त्यांचे पार्थीहावर धारूर येथे पोलीस स्टेशन मागील वैकुंठभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे असा परीवार आहे. त्या धारूरचे माजी उपनगराध्यक्ष जितेंद्र महामुनी याच्ने आई होत्या.

# आवादा कंपनीच्या विरोधात दलित शेतकऱ्याचा संताप

मस्साजोग दि.११(प्रतिनिधी)–केज तालुक्यात कायदा–सुव्यवस्थेची तीन तेरा झालेले पाहायला मिळत आहे. भ्रष्टाचार, विनयभंग, अट्रॉसिटी, मारहाण, गुंडगिरी, शालेय विद्यार्थ्यांना त्रास अशा घटना वारंवार घडत असतानाही याचे प्रशासनाला काही देणे घेणं राहिलेले नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया जनतेतून उमटत आहे.

केंद्र शासनाच्या नावाखाली विजनिर्मितीसाठी पवनचक्की उभारण्याचे काम आवादा कंपनीला देण्यात आले. मात्र विकासाच्या नावाखाली केज तालुक्यात गुंडशाहीला खतपाणी घालण्याचे काम सुरू आहे का ? असा गंभीर सवाल निर्माण झाला आहे. कारण कंपनी आल्यानंतर परिसरात पैशासाठी गुंडांचा वावर वाढला असून, सामान्य शेतकरी भयाच्या सावलीत जगत आहे. कानडी माळी परिसरातून पवनचक्कीसाठी पोल व तारांचे कनेक्शन टाकताना कायद्याची सरळसरळ पायमल्ली करण्यात येत आहे. ज्यांच्या शेतातून वीज लाईन नेली जात आहे, त्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला देणे बंधनकारक असताना, गुंडांच्या धाकाने जबरदस्तीने पोल उभारले जात आहेत, असा धक्कादायक आरोप केलाचा प्रकार समोर आला आहे.या अन्यायाचा बळी ठरले आहेत सुखदेव नागु मस्के, हातावर पोट असलेले दलित शेतकरी. त्यांच्या शेतजमिनीत कोणतीही परवानगी न घेता गुत्तेदाराने वाघमारे नावाच्या व्यक्तीमार्फत धमक्या देत जो मोबदला दिला जाईल तो घ्या, नाहीतर परिणाम भोगा असा उघड इशारा दिल्याचा आरोप केला जात आहे. संपूर्ण दलित कुटुंबाला दहशतीखाली ठेवण्यात आले आहे. या गंभीर प्रकरणी सुखदेव मस्के यांनी दि. २३ डिसेंबर रोजी केज तहसीलदारांकडे लेखी तक्रार दिली.

पान २ वर

### स्वच्छ गेवराई सुंदर गेवराईसाठी नागरिकांनी सहभाग घ्यावा–नगराध्यक्षा

# नगराध्यक्षाचे पदग्रहण होताच गावच्या स्वच्छतेसाठी भाभी लागल्या कामाला

गेवराई दि.११(प्रतिनिधी):-स्वच्छ गेवराई सुदंर गेवराईचे जनक बाळराजे दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराईकरांनी चौथ्यांदा नगरपरिषद भाजपाच्या ताब्यात दिली आहे तरी स्वच्छतेसाठी नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ. गिताभाभी पवार यांनी केले आहे.भारत सरकारने पाच वर्षासाठी सुरू केलेल्या २०२१ मधील स्वच्छ भारत अभियान २.० स्वच्छता मोहीम गेवराई शहरांमध्ये नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपरिषद कडून राबवण्यात आली.

शहरांमधील नवीन बसस्थानक व कोर्ट परिसरामध्ये नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ गीताभाभी बाळराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व सर्व नगरसेवक, नगरपरिषद कार्यालयीन स्टाफ व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांनी




स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता मोहीम

पान २ वर

## धारूर शहरातील दोन दुकाने भुरट्या चोरट्यांनी फोडली

किल्ले धारुर दि ११ ( प्रतिनिधी) :- धारूर शहरातील केज रोडवरील भांड्याचे व फर्निचरचे दुकान फोडुन रविवार दि ११ दुकानातील पाच सहा हजाराची रोकड सोबत हरभऱ्यावर फवारण्यासाठी आणलेली चार बाटल्या दारुही लांबवली. शहरातील केज रस्त्तावर असलेले जवकर स्टील सेंटर मागच्या बाजुने पत्रा उचकटुन फोडले.गल्यातील चिल्लरसह रोकड गादीवरील चादरीत बांधुन पळवली.यानंतर शेजारील श्रीकांत मोबाईल व फर्निचरचे दुकानाचा पत्रा उचकटुन गल्ल्यातील चिल्लरसह रोकड बँगेत भरुन पळ काढला.याचे सीसीटीव्ही फुटेजही पोलीसानी पाहीले.यामध्ये चोरटे कैद झाले आहेत.याप्रकरणी पोलीसात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# महाराष्ट्रातील ग्रामपंचायत निवडणुका तात्काळ जाहीर करा–भागवत गव्हाणे

किल्ले धारूर दि.११(प्रतिनिधी):- महाराष्ट्रातील ग्रामीण लोकशाहीचा कणा असलेल्या ग्रामपंचायतींच्या अस्तित्वाचा आणि गावांच्या सर्वांगीण विकासाचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये राज्यातील सुमारे १४,२३४ ग्रामपंचायतींची मुदत संपणार असून या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतींवर सरकारी अधिकारी प्रशासक म्हणून नेमू नयेत तर ग्रामपंचायत निवडणुका तात्काळ जाहीर कराव्यात अशी ठाम मागणी सरपंच ग्रामसेवा परिषद महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष भागवत गव्हाणे यांनी केली आहे.

संघटनेचे प्रदेशाध्यक्ष व सरपंच चळवळीचे नेतृत्व करणारे भागवत गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने ग्रामविकास मंत्र्यांची भेट घेऊन या संवेदनशील मुद्द्याकडे लक्ष वेधले. यावेळी ग्रामीण भागातील वास्तव परिस्थिती मांडताना गव्हाणे यांनी प्रशासनाच्या प्रशासक नेमणुकीवर तीव्र आक्षेप घेतला.भागवत गव्हाणे म्हणाले की, एकाच वेळी १४ हजारांहून अधिक ग्रामपंचायतींची मुदत संपत असल्याने जर प्रशासक नेमले गेले, तर एका अधिकाऱ्यावर किमान १० ते १५ गावांचा अतिरिक्त भार येईल. अशा परिस्थितीत संबंधित अधिकारी गावकऱ्यांना वेळ देऊ शकणार नाहीत आणि निर्णयप्रक्रिया ठप्प होण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी-मार्च हा आर्थिक वर्ष संपण्याचा कालावधी असल्याने सध्या अनेक गावांमध्ये १५ वा वित्त आयोग, जलजीवन मिशन, तसेच जिल्हा नियोजनातील विकासकामे प्रगतीपथावर आहेत. ही कामे मार्चअखेर पूर्ण करून निधी खर्च करणे अत्यावश्यक असते. मात्र, या काळात नवीन प्रशासक नेमल्यास त्यांना कामकाज समजून घेण्यातच वेळ जाईल आणि परिणामी कोट्यवधी रुपयांचा विकासनिधी अखर्चित राहून परत जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय, फेब्रुवारीनंतर राज्यात उन्हाळ्याची तीव्रता

पान २ वर

## सुजाणाबाई पवार यांचे निधन शिक्षक एस.आर.पवार यांना मातृशोक



पिंपळवंडी दि.११(प्रतिनिधी) :- पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील सुजाणाबाई राधाकिसन पवार यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ८० व्या वर्षी राहत्या घरी रविवार दि११जाने. रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले.त्यांच्या निधनाने पिंपळवंडी व पिंपळवंडी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.त्यांचा स्वभाव मनमिळावू होता.त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या.त्यांच्या पार्थिवावर रविवार दि.११ रोजी दुपारी १ वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचे महंत ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज तसेच राजकीय,सामाजिक,धार्मिक क्षेत्रातील व सर्व स्तरातील नागरिक, ग्रामस्थ,शिक्षक ,

पान २ वर

# १८ जानेवारीला पाटोद्यात शासकीय योजनांचे महाशिबिर ; प्रशासन व न्याययंत्रणा सज्ज

### प्रशासनाची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न



पाटोदा दि.११(प्रतिनिधी):- येथील दि.१८ जानेवारी रोजी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने शासकीय योजनांचे भव्य महाशिबिर आयोजित करण्यात येणार असून या महाशिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासन व न्याययंत्रणा सज्ज झाली आहे. या अनुषंगाने पाटोदा येथे महत्त्वपूर्ण पूर्वतयारी बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस पाटोदा न्यायालयाचे मा. न्यायाधीश एम. ए. शिंदे, उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख, तहसीलदार दत्तात्रय निलावाड, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव वहाब सय्यद, मुख्याधिकारी अभय कुमार जोशी, पोलीस निरीक्षक विनोद घोळवे, न्यायालयाचे कार्यालयीन अधीक्षक पाठक यांच्यासह विविध प्रशासकीय विभागांचे प्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत शिबिराच्या संपूर्ण पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. यामध्ये शिबिरस्थळावरील सुविधा, विविध विभागांचे स्टॉल्स, नागरिकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा, सुरक्षितता व्यवस्था तसेच कायदेशीर मार्गदर्शनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मा. न्यायाधीश एम. ए. शिंदे यांनी शिबिर प्रभावी, लोकाभिमुख व उद्देशपूर्तीसाठी आवश्यक त्या महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

सदर महाशिबिर वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या परांगणात आयोजित करण्यात येणार असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू आहे. या शिबिरात विविध शासकीय व निमशासकीय विभागांचे स्टॉल्स उभारण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा थेट लाभ, अर्ज प्रक्रिया तसेच योजनांची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. याशिवाय नागरिकांना मोफत कायदेशीर सल्ला व विधी सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या महाशिबिरास न्यायाधीश मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील माननीय न्यायमूर्ती व बीड जिल्ह्यातील न्यायमूर्ती यांच्या उपस्थितीत उद्घाटन होणार आहे. यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा शल्यचिकित्सक आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या उपक्रमात पाटोदा वकील संघाचा सक्रिय सहभाग राहणार असून संपूर्ण नियोजन समन्वयाने व काटेकोर पद्धतीने सुरू आहे. पाटोदा शहर व तालुक्यातील नागरिकांनी या महाशिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होऊन शासकीय योजनांचा लाभ घ्यावा व कायदेशीर माहिती मिळवावी, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जिल्हास्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार रफिक पठाण यांना जाहीर



बीड (प्रतिनिधी) - येथील दै.अलहिलाल समुहाच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा महबुब खान युसूफ जई जिल्हास्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार सायं.दै.सिटीझनचे निवासी संपादक रफिक पठाण यांना जाहीर झाला आहे. अलहिलाल समुहाचे संस्थापक संपादक खमरूल इमान यांनी या पुरस्काराची घोषणा केली आहे. दि.३१ जानेवारी २०२६ रोजी होणार्या विशेष कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

सायं.दै.सिटीझनचे निवासी संपादक रफिक साहेबखान पठाण हे २००१ पासून पत्रकारितेत सक्रीय आहेत. पत्रकारिते बरोबरच वर्तमान पत्राचे व्यवस्थापन करण्यातही त्यांचा सिंहाचा वाटा आहे. बीड शहर व जिल्ह्यातील इतर वर्तमान

पान २ वर

### श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे ७५ व्या अमृत महोत्सवी

## धर्मनाथ बीज सप्ताहाचे उद्यापासुन आयोजन




बीड (प्रतिनिधी) विसाव्या शतकातील महान संत वै सदगुरू किसान बाबा महाराज यांच्या हस्ते सुरू करण्यात आलेल्या धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहचे ७५ वे अमृत महोत्सवी वर्ष असून ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शना खाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दि.१३ जानेवारी मंगळवारी रोजी अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होणार आहे.दि.१३ जानेवारी मंगळवारी रोजी दुपारी १२ वाजता ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते विधिवत पूजा करून, संत महंत व भाविक भक्तांच्या उपस्थितीत फुले

पान २ वर

## आष्टी पोलिसांची धडाकेबाज कारवाई मावा,सुगंधित गुटखा कारखान्यावर धाड,साडेनऊ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त



आष्टी(प्रतिनिधी):- शहरातील एका ठिकाणी सुगंधित गुटखा व माव्याच्या कारखाना असल्याची गोपनीय माहिती मिळताच आष्टी पोलिसांनी रविवारी सकाळी कारखान्यावर धाड टाकून साडेनऊ लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याची कारवाई केली. आष्टी तालुक्यातील कडा येथे अवैध सुगंधित गुटखा (मावा) कारखाना असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांना मिळताच त्यानी रविवारी सकाळी माहिती घेत अवैधरित्या चालविण्यात येणाऱ्या सुगंधित गुटखा (मावा) कारखान्या वर धाड टाकत कारवाई केली. यात सुगंधित गुटखा

पान २ वर

## बीडच्या अबरार पठाणची राज्यात चर्चा



बीड प्रतिनिधी :- नांदेड येथे लोकमत असोसिएशनच्या विद्यमाने आयोजित थाई बॉक्सिंग महाराष्ट्र राज्य असोसिएशन कप २०२६ अंतर्गत १९ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत बीड जिल्ह्याच्या अबरार मुसाखान पठाण याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्णयश मिळवले. राज्यभरातून आलेल्या नामवंत खेळाडूंना पराभूत करत अबरारने आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे बीड जिल्ह्याचे नाव राज्यपातळीवर उज्वल झाले असून, त्याच्या

पान २ वर

## विज्ञान प्रदर्शनास आदर्श फाउंडेशनच्या सौ.पायलताई आकाश बाफना यांची भेट व विद्यार्थ्यांशी संवाद




जामखेड दि.११(प्रतिनिधी):- अहिल्यानगर जिल्हा परिषद शिक्षण विभाग, जिल्हा विज्ञान गणित अध्यापक संघ व रयत शिक्षण संस्थेचे श्री नागेश विद्यालय व कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ५३ वे जिल्हास्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी नागेश विद्यालय व कन्या विद्यालय मध्ये उत्साहात संपन्न झाले. बाल वैज्ञानिक प्रदर्शनात जिल्ह्यातून २४२ मॉडेल सहभागी झाले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन ब्रह्मोस मिसाइल प्रतिकृतीने अहिल्यानगर जिल्ह्याचे अति. मुख्यकार्यकारी अधिकारी विजय मुळीक साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. गटविकास अधिकारी शुभम जाधव, एनसीसी प्रमुख मयुर भोसले, नागेश विद्यालय कन्या विद्यालय येथील सर्व शिक्षक विद्यार्थी पालक व जिल्ह्यातील सर्व स्पर्धक उपस्थित होते. यावेळी सर्व जिल्ह्यातून २४२ मॉडेल सहभागी

पान २ वर

# धनगर समाजाला अनुसूचित जातीत समावेश करावा या मागणीसाठी उद्या परळीत रॅली



परळी दि ११(प्रतिनिधी)–राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जाती जमाती या प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी १३ जानेवारी रोजी शहरातील धनगर समाजाच्या वतीने राणी लक्ष्मीबाई टॉवर येथून भव्य रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीसाठी धनगर समाजासाठी लढा देणारे दीपक बोराडे यांची प्रमुख उपस्थित राहणार असून ते रॅली नंतर लोकांशी संवाद साधणार आहेत. दिनांक १३ जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजता धनगर समाजासाठी लढा देणारे संघर्ष योद्धा दीपक भाऊ बोराडे यांचे परळीत आगमन होणार आहे त्यानंतर राणी लक्ष्मीबाई टॉवर येथून धनगर समाजाच्या वतीने आरक्षण जनजागृती रॅली करण्यात येणार आहे सदर रॅली गणेशपार मार्गे होळकर चौक येथे पोहोचल्यानंतर रॅलीचा समारोप करण्यात येईल त्यानंतर दीपक बोराडे हे उपस्थित समाज बांधवांशी संवाद साधणार आहेत. या जनजागृती रॅली मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन माजी नगरसेवक गोविंद कुकर ,मुंजा फुके, राम कुकर, नवनाथ दाने, अमोल सरवदे ,सचिन झगडे, सटवा सरवदे,संभाजी फुके, आकाश कुकर ,माणिक सरवदे, राजेश धुमाळ, परमेश्वर होळकर ,अनिल सरवदे ,नवनाथ सरवदे,गणपत कुकर, किशोर सरवदे,श्याम कुकर, महादू सरवदे,श्याम लगस्कर, वैभव सरवदे ,महादू जावडे, विष्णू सरवदे ,गोविंद चिवडे, बाबा भंडारे ,मंगेश सरवदे, सुरेश सोनटक्के, श्याम भंडारे, सतीश सरवदे ,सचिन दाणे, राम होळकर, मुंजा कुकर आदी कार्यकर्त्यांनी केले आहे.

# चिंचगव्हाण येथे सभामंडपासाठी निधी मंजूर करावा ;महिलांचे आ.सोळंकेंना निवेदन



माजलगाव दि ११ (प्रतिनिधी)–माजलगाव तालुक्यातील देवखेडा रोड, नविन वसाहत चिंचगव्हाण येथे सभामंडपासाठी जागा उपलब्ध करून देऊन बांधकामासाठी शासकीय निधी मंजूर करावा, अशी मागणी येथील महिला भगिनींनी आ.प्रकाशदादा सोळंके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

चिंचगव्हाण परिसरात मोठ्या संख्येने श्री महादेवाचे भक्त वास्तव्यास असून श्रावण महिना, महाशिवरात्री तसेच इतर धार्मिक सण–उत्सवांच्या काळात पूजा–अर्चा, अभिषेक व धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने पार पडतात. मात्र नविन वसाहतीत सभामंडप अथवा पूजेसाठी आवश्यक सोयी–सुविधा नसल्याने भाविकांना दूरवर जावे लागत असून यामुळे स्थानिक नागरिकांची, विशेषतः महिलांची, मोठी गैरसोय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.देवखेडा रोड, चिंचगव्हाण येथील नविन वसाहतीत सभामंडप उभारण्यात आल्यास धार्मिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी एक कायमस्वरूपी व्यासपीठ उपलब्ध होईल. यामुळे परिसरातील सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होऊन गावाच्या सांस्कृतिक जीवनाला नवे बळ मिळेल, असा विश्वास महिला भगिनींनी व्यक्त केला आहे.सभामंडपासाठी योग्य जागा उपलब्ध करून देण्यात यावी व आवश्यक तो विकास निधी मंजूर करण्यात यावा, अशी नम्र मागणी यावेळी करण्यात आली. आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करून

पान २ वर